अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ३० मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १८० वा किंमत : ५ रुपये | पाने ८

श्री रामनवमी

श्री प्रभू रामचंद्र यांच्या चरणी कोटी-कोटी प्रणाम

हंगाम संपला; एफआरपी लांबला, बळीराजा खंगला

१४५ कारखान्यांचे गाळप संपले, १५६१ कोटी रुपये थकले

सुराज्य/सोलापूर

शेतकऱ्यांचे राजवाडे अशी ओळख असलेल्या महाराष्ट्रातील २१० पैकी १४५ साखर कारखान्यांनी कार्यक्षेत्रातील ऊस समाप्तीनंतर आपापली धुराडी बंद केली असली तरी एफआरपीच्या माध्यमातून देय असलेला १५६१ कोटी रुपयांचा शेतकऱ्यांच्या घामाचा दाम थकवला आहे. कारखान्यांनी हंगाम संपवला तरी शेतकऱ्यांचा एफआरपी मर्यादेपेक्षा जास्त दिवस लांबवला आहे. ऊस बिल कधी मिळेल; याची कोणतीच खात्री नसल्यामुळे चिंतेत असणारा शेतकरी मात्र पुरता खंगला आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या नजरा शासनाच्या भूमिकेकडे लागल्या आहेत.

एफआरपी थकवणे आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तंगवणे; त्यावर शासकीय यंत्रणेने कारवाईचे कागदी घोडे नाचवणे हे आता दरवर्षीचेच झाले आहे. एफआरपीचा नियम काहीही असला तरी कारखाने दरवर्षी कधीच नियमानुसार एफआरपी देत नाहीत.

त्यामुळे शेतकऱ्यांचे हाल कारखान्यांकडून दरवर्षी होणे हे ठरलेलेच झाले आहे. यावर्षी राज्यातील १४५ कारखान्यांनी एफआरपीचे १५६१ कोटी थकवले आहेत. यापैकी २१ कारखान्यांनी ६० टक्के, ३९ कारखान्यांनी ८० टक्के इतकीच एफआरपी दिलेली असताना साखर आयुक्त कार्यालयाने मात्र केवळ ३ च कारखान्यांवर आरआरसीची कारवाई केली आहे.

१०३५ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन

राज्यातील साखर कारखान्यांचा गाळप हंगाम अंतिम टप्प्यात आला असून १४५ कारखान्यांचे धुराडे बंद झाले आहे. आत्तापर्यंत राज्यात १०३९ लाख मेट्रिक टन उसाचे गाळप होऊन १०३५ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. राज्याचा सरासरी साखर उतारा ९.९६ टक्के एवढा आहे. यंदा ऊस गाळपात सोलापूरचा डंका वाजला असला तरी सरासरी साखर उतारा मात्र ८.९५ टक्के एवढाच आहे. सरासरी साखर उताऱ्यात कोल्हापूर जिल्हा आघाडीवर असून ११.४२ टक्के आहे. ऊस उत्पादनातील घटीमुळे गतवर्षीच्या तुलनेत यंदा ऊस गाळपासह उताऱ्यातही घट झाली आहे.

नियम काय सांगतो?

फडातील उसाची शेवटची ट्रक गेल्यानंतर १४ दिवसांनी एफआरपी देण्याचा कायदा आहे. मात्र कारखाने या नियमाला हरताळ फासत असून विलंब करणाऱ्या कारखान्यावर कारवाई करीत व्याजासह रक्कम देण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यातून केली जात आहे.

ऊस उत्पादनात झाली घट

चालू गळीत हंगामात राज्यात १०६ सहकारी व १०४ खासगी अशा एकूण २१० साखर कारखान्यांनी हंगाम घेतला आहे. यंदा राज्याची दैनंदिन गाळप क्षमता वाढून प्रतिदिन ८ लाख ८४ हजार ९५० मेट्रिक टनावर पोहोचली आहे. तसेच कारखान्यांचीही भर पडली आहे. त्यामुळे इतिहासातील उच्चांकी १५०० लाख टन ऊस गाळप होईल, असा अंदाज होता. मात्र तो फोल ठरला असून हवामानातील चढउतारामुळे यावर्षी ऊस उत्पादनात मोठी घट झाली आहे. त्याचा फटका साखर उद्योगाला बसल्याचे स्पष्ट झाले आहे.

कोल्हापूरचा उतारा ११.४२ तर सोलापूरचा ८.९५ टक्के

राज्यात सरासरी साडेतीन ते पावणेचार महिन्यांचा गळीत हंगाम पूर्ण झाला आहे. २४ मार्चपर्यंत कोल्हापूर विभागातील ३६ कारखान्यांनी २२९.९९ लाख मेट्रिक टन उसाचे गाळप करून २६२.६९ साखर लाख क्विंटल उत्पादित केली आहे. सरासरी साखर उतारा ११.४२ टक्के आहे. सोलापूर विभागातील ५० कारखान्यांनी २२९.३९ लाख मेट्रिक टन उसाचे गाळप करून २०५.२६ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे. सरासरी साखर उतारा ८.९५ टक्के एवढाच आहे.

सोलापूरचे गाळप उच्चांकी

कोल्हापूर जिल्ह्याने १ कोटी ४६ लाख ५२%२८ मेट्रिक टन उसाचे गाळप करून १ कोटी ७० लाख ११४८२ क्विंटल साखर उत्पादित केली आहे. त्या पाठोपाठ सातारा जिल्ह्याने १०.२८ टक्के एवढा दुसऱ्या क्रमांकाचा उतारा मिळवला आहे. ऊस उत्पादनात सोलापूर जिल्ह्याने १ कोटी ८० लाख २७,५२८ मेट्रिक टन एवढे उच्चांकी गाळप करून १ कोटी ६१ लाख १५५०७ क्विंटल साखर उत्पादित केली आहे. सरासरी साखर उतारा ८.९५ टक्के एवढा आहे.

जड अंत:करणाने पक्ष सोडत आहे : धर्मण्णा सादुल

काँग्रेस शहराध्यक्ष नरोटे यांच्याकडे दिला राजीनामा

सुराज्य/सोलापूर

तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या भारत राष्ट्रसमिती पक्षात प्रवेश करण्याचे निश्चित झाल्याने काँग्रेसचे माजी खासदार धर्मण्णा सादुल यांनी काँग्रेसच्या सदस्यपदाचा राजीनामा काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्याकडे बुधवारी दिला आहे. राजीनामा प्राप्त झाला असून तो प्रदेश पातळीवर आणि वरिष्ठ नेतेमंडळींना सादर केला असल्याची माहिती शहराध्यक्ष नरोटे यांनी दिली.

भारत राष्ट्र समिती पक्षाचे सर्वेसर्वा के. चंद्रशेखर राव यांनी आग्रह केल्यामुळे आणि समाज बांधवांच्या दबावामुळे आपण काँग्रेस सोडत आहे. काँग्रेसवर आपण नाराज नाही, जड अंत:करणाने पक्ष सोडत आहे. पक्षसोडत असताना खूप दु:ख होत आहे. मात्र काही कारणामुळे पक्ष सोडत आहे. त्यामुळे काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत असल्याचे सादुल यांनी राजीनाम्यामध्ये म्हटले आहे. सादुल यांनी प्रथम प्रवेश करण्यास नकार दिला होता. मात्र दोन दिवसांपूर्वी के. चंद्रशेखर राव यांची प्रत्यक्ष भेट झाली आणि त्यांनी पक्षात येण्यासाठी पुन्हा आग्रह केला.

त्यानंतर आपण त्यांची विकासात्मक दृष्टी पाहून त्यांचे नेतृत्व मान्य केले असल्याचे सांगत आपण लवकरच के. चंद्रशेखर राव यांच्या भारत राष्ट्र समिती पक्षात प्रवेश करणार असल्याचे पत्रकार परिषदेत जाहीर केले होते. त्यानुसार त्यांनी हा राजीनामा दिला आहे. सादुल यांच्या जाण्याने काँग्रेसला काही फरक पडेल का? अशी विचारणा करताच शहराध्यक्ष नरोटे यांनी प्रतिक्रिया देणे टाळले. मात्र राजीनामा मिळाला असल्याचे जाहीर केले.

कुर्डूवाडीतील रेल्वे कारखान्यात आग

कुर्डूवाडी : कुर्डूवाडी येथील रेल्वे वर्कशॉपमध्ये स्क्रॅप मटेरियला आग लागली असून यामध्ये किती रुपयांचे नुकसान झाले याबाबत कोणतीही माहिती समजली नाही.रेल्वे कारखान्यांतील आग त्वरित विझवण्यात आल्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

रेल्वे वर्कशॉप मध्ये मालगाडी दुरुस्तीचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. याचबरोबर कारखान्याचे वाढवण्यासाठी आतमध्ये अनेक कामे सुरू आहेत. अशा परिस्थितीमध्ये रेल्वे कारखान्यांच्या स्क्रॅप मटेरियलला बुधवारी दुपारच्या वेळेस अचानकपणे आग लागली. या ठिकाणी उपस्थित कर्मचाऱ्यांनी ही आग पाहून प्रसंगावधान राखत त्वरित आग विझवली. यामुळे मोठी दुर्घटना टळली. ही आग रात्रीच्या वेळेस लागली असती तर आगीने मोठा तांडव निर्माण करून लाखो रुपयांचे नुकसान झाले असते. दरम्यान या आगीत नेमके किती रूपयाचे नुकसान झाले हे मात्र समजू शकले नाही. कुर्डुवाडी नगरपालिकेचे अग्निशामक वाहन आहे मात्र रेल्वे गेट नं ३८ हे बंद असल्या कारणाने पाच मिनिटीच्या अंतरावर असणाऱ्या रेल्वे कारखान्यात पोहोचण्यासाठी अग्निशामक वाहनाला दोन ते

अडीच किलोमीटर गावाला वळसा मारुन रस्ता पार करत घटनास्थळाला पोहोचावे लागते.

अशावेळी घटनास्थळी अपघातग्रस्त ठिकाणी पोचण्यासाठी उशीर होतो. तोपर्यंत आग तीव्र रूप धारण करुन मोठे नुकसान होऊ शकते.त्यामुळे स्वतंत्र अग्निशमन दलाची उभारणी करण्याची मागणी होत आहे.

खासदार गिरीश बापट यांचे निधन

पुणे : भाजप खासदार गिरीश बापट यांचं दीर्घ आजाराने निधन झालं आहे. मागील काही दिवस त्यांच्यावर पुण्यातील दीनानाथ रुग्णालयात उपचार सुरु होते. उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. वयाच्या ७३ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला.

अंत्यविधी संध्याकाळी ७ वाजता वैकुंठ स्मशान भूमीत होणार आहे. १९७३ पासून ते राजकारणात सक्रिय होते. पुण्यात भाजपची यशस्वी वाटचाल करण्यात त्यांचा महत्वाचा वाटा आहे. पुण्याची ताकद गिरीश बापट अशी त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने भाजपमध्ये मोठी पोकळी निर्माण झाली आहे. पुण्यातील कसबा मतदार संघात आणि इतर पुण्यात भाजप वाढवण्यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत केली होती. बापट आजारी असताना भाजपच्याच नाहीतर विरोधी पक्षाच्या नेत्यांनीही त्यांची भेट घेतली होती. त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती. मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस आणि राष्ट्रवादीचे सर्वे सर्वा पवार यांच्यासोबतच इतर नेत्यांनीही भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती.

झाडावरुन पडल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

शेळ्यांना सुबाभळीच्या झाडाचा पाला काढत असताना अचानक झाडावरून तोल जाऊन खाली पडल्याने ५० वर्षीय शेतकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना बुधवार २९ मार्च रोजी सकाळी ९ च्या सुमारास वाढेगाव (ता. सांगोला) येथे घडली. सदाशिव आत्माराम माने (वय ५०) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. याबाबत पुतण्या शहाजी विलास माने (रा. वाढेगाव) यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे.

मृत शेतकरी सदाशिव माने हे बुधवारी सकाळी ९ च्या सुमारास शेळ्यांना चरण्यासाठी सुबाभळीच्या झाडावर चढून पाला काढत होते. त्यावेळी अचानक त्यांचा झाडावरून तोल जाऊन खाली पडल्याने जखमी झाले. पुतण्या दीपक माने यांने तात्काळ उपचाराकरता त्यांना सांगोला येथील खासगी रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्यांचा दुपारी ३ च्या सुमारास मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

कार्यालय सील केल्याने बीएसएनएलची महापालिकेत धाव

▸ कर आकारणीवर अधिकाऱ्यांनी घेतला आक्षेप

शास्तीसह संपूर्ण कर भरावाच लागेल: आयुक्त

सोलापूर : होटगी रोडवरील बीएसएनएलचे सब डिव्हिजन कार्यालय मिळकतकर थकबाकी पोटी महापालिकेने सील केल्यानंतर दुसऱ्या दिवशी बुधवारी बीएसएनएलच्या अधिकाऱ्यांनी महापालिकेत धाव येतली. अधिकाऱ्यांची भेट येत कर आकारणीवर आक्षेप येतला. मात्र शास्तीसह संपूर्ण कर भरावाच लागेल, अशी ठाम भूमिका महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी येतली आहे.

सोलापूर महापालिका मिळकत कर वसुली पथकाकडून मंगळवारी होटगी रोडवरील बीएसएनएलचे सब डिव्हिजन कार्यालय ७५ लाख ६७ हजार ५५३ रुपयाच्या मिळकत कर थकबाकीपोटी सील करण्यात आले तसेच येथील पाण्याचे २ नळही बंद करण्याची बेधडक कारवाई केली. त्यानंतर बीएसएनएलच्या संबंधित अधिकाऱ्यांनी थेट महापालिकेत धाव येतली. मिळकत कराची आकारणी अधिक केल्याचा आक्षेप येतला. कराची रक्कम अधिक आहे, असे त्यांनी सांगितले. अधिकाऱ्यांची भेट येऊन आपले म्हणणे मांडले तसेच महापालिकेकडे बीएसएनएलचे सुमारे साडेतीन लाख रुपये बिल थकीत आहे तेही त्यांनी भरावे , असे स्पष्ट केले. आमचे कार्यालय सिल केल्यामुळे एनटीपीसी, पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक कार्यालयासह इतर शासकीय कार्यालयात अडचण होण्याची शक्यता असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. आम्ही पाच लाख रूपये भरले आहेत, लवकर कार्यालय सुरू करावे, अशी मागणी त्यांनी केली.

त्यांनी थकबाकी भरल्यावर आम्हीही भरू : आयुक्त

या संदर्भात महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांना विचारले असता कोणत्याही स्थितीत शास्तीसह संपूर्ण कर बीएसएनएल कार्यालयाला भरावा लागेल. कोणतेही सूट मिळणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर अगोदर नोटीस दिल्याप्रमाणे बीएसएनएलने आपली कर थकबाकी भरावी. साहजिकच महापालिका बीएसएनएलचे बिल भरणारच आहे, असेही त्यांनी सांगितले.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



गौप्यस्फोटाची मालिकाच चालु झालीय !

कल्याण
247-37-700

मेन बाजार
114-60-127

एक महिना अगोदरच मुद्रांक कार्यालयाचा ३९३ कोटींचा झेंडा

■ ३८० कोटींचे उद्दिष्ट, शासनाच्या ३९३ कोटींचा महसूल जमा

सुराज्य/सोलापूर

आर्थिक वर्ष संपायला एक महिना शिल्लक असताना सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेल्या उद्दिष्टाच्या तब्बल १३ कोटी अधिक महसूल वसूल करून आपला झेंडा रोवला आहे. शासनाने मुद्रांक कार्यालयाला चालू आर्थिक वर्षात ३८० कोटींचा महसूल वसूल करण्याचे उद्दिष्ट दिले होते.

परंतु मुद्रांक कार्यालयाने मार्च महिना शिल्लक असताना फेब्रुवारी महिन्यापर्यंतच ३९३ कोटींचा महसूल शासनाच्या तिजोरीत जमा करून उद्दिष्टाच्या पुढे झेप येतली आहे. फेब्रुवारी अखेर १ लाख २ हजार १३२ दस्त नोंदणीतून तब्बल ३९३ कोटी ६८ लाख रुपयांचा महसूल शासनाच्या तिजोरीत जमा झाला आहे. गेल्या वर्षी २०२१-२२ मध्ये मुद्रांक कार्यालयाकडे ९० हजार ५२३ दस्त नोंदणीतून ३८१.२३ कोटींचा महसूल मिळाला होता. ही आकडेवारी डोळ्यासमोर ठेवून शासनाने २०२२-२०२३ आर्थिक वर्षासाठी ३८० कोटींचे उद्दिष्ट दिले होते. मात्र मुद्रांक कार्यालयाने वर्ष संपायला एक महिना शिल्लक असताना आपली जबाबदारी पूर्ण केली आहे. चालू आर्थिक वर्षात एप्रिल महिन्यात २६ कोटी ८१ लाख, मे मध्ये ३४ कोटी २९ लाख, जूनमध्ये ४० कोटी २० लाख, जुलैमध्ये ४० कोटी २६ लाख, ऑगस्टमध्ये ३५ कोटी २३ लाख, सप्टेंबरमध्ये ३६ कोटी ७२ लाख, ऑक्टोबरमध्ये ३२ कोटी ५३ लाख, नोव्हेंबरमध्ये ३८ कोटी ७६ लाख, डिसेंबरमध्ये ३८ कोटी ८३ लाख, जानेवारीमध्ये ३५ कोटी ६१ लाख, फेब्रुवारी महिन्यात ३४ कोटी ४४ लाख असे एकूण ३९३ कोटी ६८ लाख रुपये शासनाच्या तिजोरीत जमा झाले आहेत. यात सर्वात जास्त महसूल जुलै महिन्यात तर सर्वात कमी महसूल एप्रिल महिन्यात मिळाला आहे.मार्च महिन्यातील आकडेवारी अद्याप उपलब्ध झाली नाही मात्र या महिन्यात सुमारे ५० कोटी महसूल मिळण्याची शक्यता आहे.

कर्मचाऱ्यांनी कर्तव्य पार पाडले : सध्या वर्षाखेर असल्याने सर्व आर्थिक व्यवहाराबरोबरच खरेदी-विक्रीचे व्यवहार पूर्ण करण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. गेल्या १५ दिवसांपासून मुद्रांक कार्यालयात खरेदी-विक्रीच्या व्यवहारासाठी गर्दी दिसत आहे. सरकारी कर्मचाऱ्यांनी पेन्शनच्या प्रश्नावर संप केला होता. तरीही या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी संपात सहभाग न घेता नागरिकांचे खरेदी-विक्रीचे व्यवहार पूर्ण करून आपले कर्तव्य पार पाडले आहे.

आज नोंदणी कार्यालये सुरू : गुरुवार रामनवमीची सुट्टी असली तरी मार्चअखेर अर्थात वर्षाखेर असल्याने नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी सोलापूर शहरातील उत्तरची तिन्ही नोंदणी कार्यालये, पंढरपूर येथील दोन्ही कार्यालये, दक्षिण सोलापूर कार्यालय, बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा, मंगळवेढा, सांगोला, अकलूज येथील नोंदणी कार्यालये सुरू राहणार आहेत. सुट्टी असली तरी दस्त नोंदणीची कामे व इतर कार्यालयीन कामकाज सुरू राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आपले नोंदणीचे व्यवहार करून घ्यावेत, असे आवाहन मुद्रांक जिल्हाधिकारी गोविंद गिते यांनी केले आहे.

अजातशत्रू नेता...

पुण्याचे विद्यमान खासदार तथा भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते गिरिष बापट यांच्या जाण्याने केवळ पुणेच नव्हेतर सारा महाराष्ट्र हळहळला.राजकारणी लोक शेवटच्या श्वासापर्यंत लढत असतात,असे म्हणतात.बापट हेही त्यापैकीच होते.प्रकृती बरी नव्हे तर सारे शरिर साथ देत नसतानाही कसब्याच्या पोटनिवडणुकीत ऑक्सिजनच्या नळ्या नाकाला लावून ते प्रचार सभेत उतरले होते.त्यांची भावनिक साद ऐकून जमलेल्या कार्यकर्त्यांनाच नव्हेतर घरा घरात बसून हा प्रसंग पाहाणाऱ्यांनाही अश्रू अनावर झाले होते.त्यांची ही इच्छाशक्ती पाहून त्यांच्याकडे फायटर म्हणून पाहिले गेले पण हा फायटर साऱ्यांना सोडून निघून गेला.भाजपची स्थापना झाल्यानंतर पहिल्या फळीतील जे निष्ठावंत,लढवय्ये नेते होते,बापट हेही त्यापैकीच होत.ऐंशी-नव्वदच्या दशकात देशभर काँग्रेसचा झंझावात होता. अशा परिस्थितीत भाजपच्या पहिल्या फळीतील नेते काँग्रेसशी निकराची लढत द्यायचे.काँग्रेसच्या लाटेत भाजपच्या नशिबी पराभवच असायचा. तरी देखील ते नेते हिमतीने लढत असत.बापटांच्या कारकिर्दीचा इतिहास तोच आदर्श सांगतो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत तयार झालेल्या गिरीशभाऊंनी जात, धर्म, पंथ, प्रांत, भाषा, पक्षभेदांच्या भिंती ओलांडून समाजकार्य, विकासाचे राजकारण केले. टेल्को कंपनीतल्या कामगार नेत्यापासून सुरु झालेला त्यांचा प्रवास पुणे महापालिकेचे नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, आमदार, मंत्री, खासदार पदापर्यंत पोहचला. चार दशकांच्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत गिरीशभाऊंना पुणेकरांचे

अलोट प्रेम मिळाले पुणे शहराच्या राजकारणात गेली ४० वर्षं अतिशय सक्रिय असलेले बापट साऱ्याच राजकीय पक्षातील नेत्यांचे मित्र होते. संयमी,अभ्यासू असे त्यांचे व्यक्तीमत्व होते. त्यांचे जाणे हे पुण्याच्या राजकारणाचे, समाजकारणाचे, पुणे-महाराष्ट्र भाजपाचे हे फार मोठे नुकसान आहे. विरोधी पक्षांना सोबत घेऊन कसे काम करायचे यामध्ये त्यांचे कौशल्य होते. एखादी समस्या कशी सोडवायची,याची कसब त्यांच्या अंगी होते. ते सर्वांचे मित्र होते. कुणाशीही शत्रुत्व नाही. गेल्या ५ वर्षांत सातत्याने गिरीश बापट यांनी सर्व सहकारी सदस्यांशी सलोख्याचे संबंध ठेवले होते. अत्यंत मनमिळाऊ आणि लोकप्रिय नेता असे त्यांचे वर्णन करावे लागेल. मंत्रीपद मिळाल्यानंतरही कोणतीही मिजास न ठेवता त्यांनी खेळकर स्वभाव कायम ठेवला होता. पुण्यातील कसबा पेठ मतदारसंघात किंगमेकर अशी ओळख असणाऱ्या बापट यांनी त्यांच्या राजकीय कारकीर्दीत संघ स्वयंसेवक, कामगार नेता, नगरसेवक, आमदार आणि खासदार अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. बापट हे मूळचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक राहिले आहेत. जनसंघापासून ते राजकारणात उतरले. नगरसेवक पदापासून सुरुवात केलेले गिरीश बापट यांनी १९९५ मध्ये आमदारकीची पहिल्यांदा निवडणूक लढविली अन पुढे सलग २०१४ पर्यंत ते पाच वेळा आमदार म्हणून निवडून आले. यानंतर १९९६ साली त्यांना भाजपाने पुण्यातून लोकसभेची उमेदवारी जाहीर केली होती. पण बापट यांचा पराभव झाला आणि काँग्रेसचे सुरेश कलमाडी खासदार झाले. २०१४ मध्ये गिरीश बापट यांना लोकसभा निवडणूक लढवायची होती. मात्र, पक्षाने अनिल शिरोळे यांना उमेदवारी दिल्यामुळे त्यांची संधी हुकली. परंतु, २०१९ मध्ये योग्यपणे मोर्चेबांधणी करत त्यांनी खासदारकीचे तिकीट मिळवले. त्यानंतर निवडणुकीत त्यांनी काँग्रेसच्या मोहन जोशी यांचा तब्बल ९६ हजार मतांनी पराभव केला. राज्यातील भाजपच्या जुन्या जाणत्या नेत्यांपैकी एक असलेल्या बापट हे नेहमीच चर्चेत असत. पुण्यातील स्थानिक राजकारणात त्यांचा दबदबा होता. बापट यांचा जन्म ३ सप्टेंबर १९५० रोजी पुण्यात झाला. तळेगाव दाभाडेमधून प्राथमिक शिक्षण झाल्यावर त्यांचे माध्यमिक शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल रमणबागेत झाले. बीएमसीसीत वाणिज्य शाखेची पदवी घेतल्यावर बापट १९७३ मध्ये टेल्कोमध्ये कामगार म्हणून रुजू झाले. त्यानंतर दोन वर्षांतच आणीबाणीमध्ये १९ महिन्यांचा कारावास नाशिक जेलमध्ये त्यांनी भोगला.पुण्याच्या राजकारणात 'भाऊ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बापट यांनी तरुणपणी टेल्को कंपनीत काम केले. यावेळी त्यांनी कामगारांच्या मागण्यांसाठी अनेकदा लढा दिला होता.आणीबाणीच्या काळात तुरुंगात शिक्षा भोगून आल्यानंतर गिरीश बापट यांच्या राजकीय कारकीर्दीला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, परिवारातील संस्थांतील विविध पदांची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पेलली.त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन.

पर्यावरण

जलसंकटावर मात करण्याची गरज

संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक जल विकास अहवालानुसार जगातील पाण्याची मागणी दरवर्षी जवळपास एक टक्क्याने वाढत असून पुढील दोन दशकांत ती आणखी वाढणार आहे. या अहवालानुसार विकसनशील आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्था असलेल्या देशांमध्ये पाण्याची मागणी झपाट्याने वाढणार आहे. शेतीपेक्षा औद्योगिक आणि घरगुती वापरासाठी पाण्याच्या मागणीला अधिक वेग येईल. जगभरातील अनेक शहरांना हवामान बदलामुळे पूर आणि दुष्काळासारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सध्या भारतातील अनेक शहरांमध्ये पाण्याचे भीषण संकट आहे. विशेष म्हणजे जलसंकटाचा सामना करणारी बहुतांश शहरे नद्यांच्या काठावर वसलेली आहेत. वास्तविक, येथील मोठ्या लोकसंख्येने या नद्यांच्या पाण्याचा अव्याहतपणे वापर केला आहे. अनेक पाण्याचे स्रोत सतत कोरडे होत आहेत.

ज्या वेगाने जंगले नष्ट होत आहेत त्यापेक्षा तिप्पट वेगाने पाण्याचे स्रोत कोरडे होत असल्याचे संशोधनातून दिसून आले आहे. नीती आयोगाच्या २०१८ च्या अहवालानुसार, देशातील अनेक शहरांमध्ये जलसंकट गंभीर स्वरूप धारण करत आहे. दिल्ली, बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद आदी शहरांना या समस्येचा सर्वाधिक सामना करावा लागणार आहे. २०३० पर्यंत देशातील सुमारे चाळीस टक्के लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होणार नाही. येत्या अकरा वर्षांत देशातील साठ कोटींहून अधिक जनता पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागेल, अशी भीती व्यक्त होत आहे. जागतिक वन्यजीव निधी (डब्लूडब्लुएफ) च्या सर्वेक्षणात पुढील तीस वर्षांत जगातील १०० शहरांमध्ये पाण्याचे गंभीर संकट निर्माण होणार असल्याचे म्हटले आहे.

गेल्या दहा वर्षात भूजल पातळी ५४ टक्क्यांनी घटली आहे. देशातील ५५ टक्के विहिरी जवळपास कोरड्या पडल्या आहेत. वातावरणातील बदलामुळे आणि वाढत्या तापमानामुळे भविष्यात दुष्काळाची समस्या अधिक गडद होण्याची शक्यता आहे. तसे पाहिले तर आपल्या देशातील वार्षिक सरासरी पर्जन्यमान ११%० मिमी आहे, जे पश्चिम अमेरिकेपेक्षा जवळजवळ सहा पट जास्त आहे. असे असूनही, देशातील शहरी भागातील सुमारे ९ कोटी सत्तर लाख लोक पिण्याच्या स्वच्छ पाण्यापासून वंचित आहेत आणि ग्रामीण भागातील सुमारे %० टक्के लोकांना प्रदूषित पाणी प्यावे लागते. देशातील सुमारे ३३ कोटी लोक अशा ठिकाणी राहत आहेत जिथे दरवर्षी भीषण दुष्काळ पडतो. दुष्काळाला वैतागून शेतकरी आत्महत्या करत आहेत. देशात अनेक नद्या असल्या तरी त्यातील उपलब्ध पाण्याचा दर्जा मात्र खूपच खालावला आहे.

सध्या एकूण पाण्याच्या वापरापैकी ८५ टक्के पाणी शेतीसाठी, १० टक्के उद्योगांमध्ये आणि ५ टक्के घरांमध्ये वापरले जाते. १९९४ मध्ये, देशात गोड्या पाण्याची दरडोई उपलब्धता सहा हजार घनमीटर होती. सन २००० मध्ये ते प्रति व्यक्ती दोन हजार तीनशे घनमीटर इतके कमी करण्यात आले. २०२५ पर्यंत, त्याची उपलब्धता प्रति व्यक्ती केवळ १६०० घनमीटरपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे. देशातील पावसाच्या पाण्यापैकी पासष्ट टक्के पाणी समुद्रात वाहून जाते. गटारी- नाल्यांमध्ये दररोज चार लाख लिटर पाणी सोडले जाते. पण यापैकी फक्त २० टक्केच पाणी पुन्हा वापरले जाते. देशभरात पडणाऱ्या एकूण पावसापैकी केवळ पाच टक्के पावसाचे पाणी संरक्षित केले, तरी वर्षभराची १०० कोटींहून अधिक लोकांची तहान भागू शकते. त्यासाठी स्थानिक पातळीवर भूजल व्यवस्थापन प्रकल्प उभारावे लागतील, त्यामुळे लोकांना त्यांच्या भागातील भूजलाच्या उपलब्धतेची माहिती मिळेल आणि ते त्याचा योग्य वापर करू शकतील.

देशातील अनेक नद्या, तलाव आणि जलसाठे कोरडे पडले आहेत. त्यामुळे अनेक भागातील पाण्याची पातळी धोकादायक पातळीच्या खाली गेली आहे. ज्या नद्यांवर धरणे बांधून पाण्याचा मुक्त प्रवाह बंद केला आहे, त्या

नद्यांनाही धोका निर्माण झाला आहे.ज्या धरणाद्वारा पाणी अडवले जात आहे, त्या पाण्याचा औष्णिक वीज केंद्र, अणुऊर्जा केंद्रे आणि औद्योगिक युनिटसाठी जास्तीत जास्त वापर केला जात आहे. शेतकरी सिंचनासाठी खोल खोदलेल्या कूपनलिकेचा वापर करतात. घरगुती आणि औद्योगिक गरजांसाठीदेखील भूजल साठ्याचा वापर वाढला आहे.ा अंदाधुंद पाणी पिळवणुकीचा परिणाम म्हणजे ज्या भागात दहा वर्षांपूर्वी २०० ते ३०० फूट खोलीवर पाणी उपलब्ध होते, त्या भागात आता पाण्याची पातळी %०० ते १००० फूट खोल गेली आहे. आणखी एक गंभीर बाब म्हणजे माणसे तलाव, नद्यांच्या जमिनीवर अतिक्रमण करू लागले आहेत. पाण्याचा अपव्यय थांबविण्यासाठी ठोस प्रयत्न केले जात तर नाहीतच. शिवाय उपलब्ध असलेले साफ व स्वच्छ पाणीदेखील हळूहळू प्रदूषित होत आहे. त्यामुळे जलसंधारण, पाण्याचा विवेकपूर्ण वापर, पाण्याचा पुनर्वापर आणि भूजल पुनर्भरण याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. युनोस्कोच्या जागतिक जल विकास अहवाल २०१८ मध्ये असे नमूद केले आहे की भारत हा जगातील सर्वात जास्त भूजलाचा अतिशोषण करणारा देश आहे. खते आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळेदेखील जलप्रदूषण वाढत आहे. पाण्याचे शुद्धीकरण करून ते पुनर्वापरासाठी योग्य बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यामध्ये नॅनो तंत्रज्ञानाचा वापर करता येईल. पावसाचे ८५ टक्के पाणी नद्यांमधून समुद्रात जाते. पाणीटंचाईवर मात करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि कृत्रिम पुनर्भरण तंत्र वापरण्याची गरज आहे. विहिरी व कूपनलिका यांची खोली निश्चित केली पाहिजे. एका मानकानुसार, विहिरी आणि कूपनलिका यांची खोली केवळ चारशे फूट म्हणजे एकशे वीस मीटरपर्यंत असायला हवी. कृषी क्षेत्राच्या सिंचनासाठी ठिबक आणि स्प्रिंकलर पद्धतीचा वापर वाढायला हवा. कृत्रिम पुनर्भरण तंत्राचा अवलंब करून डोंगराळ भागातील भूजल पातळी सुधारता येते. या तंत्राद्वारे वाया जात असलेल्या पाण्याची बचत करून ग्रामीण भागात भूजल पातळी वाढवता येऊ शकते.

जलसंकट टाळण्यासाठी प्रभावी जलव्यवस्थापनासोबतच पाण्याचा गैरवापर रोखण्यासाठी गांभीर्याने पावले उचलण्याची गरज आहे. सरकारकडून होत असलेल्या प्रयत्नांबरोबरच सर्वसामान्यांनाही आपली जबाबदारी समजून घ्यावी लागेल, तरच आपण जलसंकटाला तोंड देऊ शकू. कृषी क्षेत्रातील पाण्याच्या वापरावर नियंत्रण ठेवण्यासाठी, सिंचनाच्या आधुनिक पद्धतींचा अवलंब, पावसाच्या पाण्याचे संवर्धन आणि दूषित पाणी पुनर्वापर करण्यायोग्य करण्यासाठी योग्य प्रयत्न करावे लागतील. यासोबतच भूगर्भातील पाणी प्रदूषणापासून वाचवण्यासाठीही लक्ष द्यावे लागणार आहे. वॉटर हार्वेस्टिंगचे तंत्र आणि नवनवीन शोध याबरोबरच भारतातील पारंपरिक ज्ञान पद्धतीचाही आपण अवलंब केला पाहिजे. पूर्वी पावसाचे पाणी विहिरी, तलाव, सरोवर, पाझर तलाव इत्यादींमध्ये पुरेशा प्रमाणात साचत असे. ती परंपरा आपल्याला पुन्हा सुरू करावी लागेल, जेणेकरून जलाशयांमध्ये पुनर्भरण करून साठवता येईल. पावसावर आधारित शेती, नैसर्गिक शेतीसोबतच दुष्काळ प्रतिरोधक बियाणांच्या वापरालाही प्रोत्साहन द्यायला हवे. रसायने आणि कीटकनाशकांचा वापर कमीत कमी ठेवला पाहिजे, त्यामुळे जलप्रदूषण टाळता येईल. जलस्रोत जंतूमुक्त करण्यासाठीही व्यवस्था असायाला हवी. पाण्याचा पुनर्वापर करणेदेखील अत्यंत महत्वाचे आहे.

- मच्छिंद्र ऐनापुरे

धार्मिक

अयोध्येचा राजा

हिंदू धर्मग्रंथानुसार, त्रेतायुगातील रावणाचे अत्याचार संपवण्यासाठी आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी भगवान विष्णूने मृत्यूच्या जगात श्री राम म्हणून अवतार घेतला. श्री रामचंद्रजींचा जन्म चैत्र शुक्ल नवमीला राणी कौसल्याच्या पोटी पुनर्वसु नक्षत्रात आणि कर्क राशीत राजा दशरथाच्या घरी झाला. रामनवमी संपूर्ण भारतात साजरी केली जाते. तेलंगणातील भद्राचलम मंदिर हे अशा ठिकाणांपैकी एक आहे, जिथे रामनवमी मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते. रामनवमी हा सण गेल्या अनेक वर्षांपासून साजरा केला जातो.

रामायणानुसार, अयोध्येचा राजा दशरथ याला फार काळ संततीचे सुख कोणीही देऊ शकले नाही, त्यामुळे राजा दशरथ खूप अस्वस्थ असायचे. पुत्रप्राप्तीसाठी राजा दशरथ यांना वशिष्ठ ऋषींनी पुत्रकामेष्टी यज्ञ करण्याची कल्पना दिली होती. यानंतर राजा दशरथाने आपल्या जमाई महर्षी ऋषिश्रृंगासोबत यज्ञ केला. त्यानंतर यज्ञकुंडातून एक दैवी पुरुष हातात खिरीची वाटी घेऊन बाहेर आला. यज्ञ संपल्यानंतर महर्षी ऋषीशृंगाने दशरथाच्या तीन पत्नींना खिरीची वाटी खायला दिली. खीर खाल्ल्यानंतर काही महिन्यांनी तिन्ही राण्या गरोदर राहिल्या. बरोबर ९ महिन्यांनंतर, राजा दशरथाची ज्येष्ठ राणी कौसल्याने राम, भगवान विष्णूचा सातवा अवतार, कैकेयी यांनी भरत आणि सुमित्रा यांना लक्ष्मण आणि शत्रुघ्न यांना जन्म दिला. भगवान रामाचा जन्म दुष्ट प्राण्यांचा नाश करण्यासाठी पृथ्वीवर झाला होता.



चैत्र शुद्ध नवमी हिंदू पंचागानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस आहे. या तिथीस भगवान विष्णूचा सातवा अवतार समजले गेलेले श्रीराम यांचा जन्म झाला, अशी मान्यता आहे. हा दिवस श्री रामनवमी म्हणून साजरा करतात. त्या दिवशी दुपारी सूर्य डोक्यावर आल्यावर (दुपारी १२:०० वाजता) रामजन्माचा सोहळा होतो. श्री रामांच्या चित्रास वा मूर्तीस इतर हारांसमवेत गाठी पण घालतात. श्री रामांची पूजा करताना त्यानां करंगळीजवळच्या बोटाने, म्हणजेच अनामिकेने गंध लावतात. तसेच श्री रामांना हळद-कुंकू वाहताना आधी हळद अन् नंतर कुंकू, उजव्या हाताच्या अंगठा आणि अनामिका यांच्या चिमटीत घेऊन चरणांवर वाहतात. श्रीरामांना केवडा, चंपा, चमेली अन् जाई ही फुले वाहतात. त्यानंतर आरती करून प्रसाद वाटतात. रामजन्माच्या दिवशी साजऱ्या केल्या जाणाऱ्या उत्सवांत रामजन्माचा पाळणा अवश्य म्हटला जातो. श्रीरामनवमीच्या दिवशी मठ-मंदिरात भजन, पूजन, कीर्तन, प्रवचन इत्यादी कार्यक्रम करून हा जन्मोत्सव सोहळा साजरा केला जातो. काही ठिकाणी तर गुढीपाडवा ते रामनवमी ह्या काळांत रामायण ग्रंथाचे वाचन, रामकथेचे निवेदन, गीत रामायणाचे गायन वगैरे कार्यक्रमही केले जातात. श्रीराम हे सर्व आबालवृद्धांची लाडकी देवता असल्यामुळे सर्व लहान थोर मंडळी ह्या उत्सवात भाग घेतात. रामनवमीचा दिवस प्रभू रामाचे नुसते स्वागत करण्याचा दिवस नाहीतर, प्रभू रामचंद्रांच्या गुणाचे स्वागत करण्याचा दिवस आहे. त्यांच्याकडे जे गुण होते, ते आपल्याला अंगी उतरण्याचा हा दिवस आहे. श्रीराम नवमी उत्सव अयोध्या, नाशिक, पंचवटी या तीन ठिकाणी खूप मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. रामनवमीची पूजा विधी : राम जन्मोत्सव बऱ्याच ठिकाणी श्री राम मंदिरात सामूहिक तसेच प्रत्येक हिंदूंच्या घरी साजरा करण्यात येतो. राम मंदिराची सजावट करून चैत्र महिन्याच्या सुरुवातीलाच रामनवमीची तयारी सुरू केले जाते. राम नवमीपर्यंत हा एक प्रकारे उत्सव असतो. या दिवशी राम जन्मोत्सव साजरा केला जातो. त्या दिवशी राम मंदिरामध्ये राम जन्मोत्सवाला हजारो लोक एकत्र येऊन सामूहिक राम उत्सव साजरा करतात. जगातील प्रत्येक देशाला रामायण आदर्श वाटते. आपल्याला घरातील लहान मंडळींना रामायणाची जाणीव करून द्यावी. रामायण कसे होते. राम व सीता यांचे जीवन कसे होते. याविषयी नक्कीच घरातील लहान व्यक्तींना मुलांना सांगणे आवश्यक आहे.

- गायत्री रामकृष्ण अघोर

जगद्गुरु तुकोबाराय

देहूला तुकाराम बीजेनिमित्त लाखोंची मांदियाळी जमते आणि वैकुंठ गमनाच्या सोहळ्यात नामाच्या गजरात दंग झालेला वारकरी पाहून

आपुले मरण पाहिले म्यां डोळा।
तो जाला सोहळा अनुपम्य।।

हा तुकोबांचा जीवनाला एका अर्थाने निरोपही कसा आनंदाने द्यावा, हा भाव, अक्षरश: सुखसोहळा अनुभवता येतो. सामान्य माणसाने जीवन कसे आनंदाने जगावे, संकटे आली, तरी यशापयशांना सामोरे जाताना निराश न होता, तो प्रत्येक क्षण आव्हान-संधी समजून त्यावर मात करण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे. दु:खाचा क्षणही सुखाचा करून जीवनाचा भवसागर पार करण्याचा संदेश त्यांनी जगाला दिला. ज्याचे असे जीवन, तोच खऱ्या अर्थाने भागवत' वारकरी. तसेच, लौकिकार्थाने खडतर जीवन तुकोबांच्या वाटेला आले. परकीय सत्तेच्या आक्रमणाचे दु:ख, दारिद्र्य यांनी ग्रासले, तरी आनंदाचे डोही आनंद तरंग' म्हणत ते निराशा, यातना या शब्दांना थारा न देता प्रत्येक तरंग हा आनंद तरंग मानणारे तुकोबा भक्ती-ज्ञान व प्रबोधन, समाजजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन आणि छत्रपती शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यासाठी प्रेरणा देणे, यात सर्वस्व विसरून रममाण झाले. दुष्काळात सर्व गेले, वाटण्या झाल्या भाऊबंदांच्या, स्थावरसंपत्ती, धन याचा वाटा न मागता कर्जाच्या वह्या माझ्या वाट्याला द्या, बाकी धनदौलत मला काही नको, असे म्हणून सर्व वह्या नदीत बुडवून सर्व कर्ज माफ करणारे तुकोबाराय एकमेवद्वितीय. याही स्थितीत खचून न जाता प्रयत्नवादाचा नवा मार्ग दाखविणारे

असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास, तुका म्हणे ।।' असे सांगणारे तुकोबा चित्ती असू द्यावे समाधान।' अशी शिकवण देतात. अडचणीत मनुष्य अंधश्रद्धेकडे जातो, त्यावरही तुकोबांनी प्रखर शब्दांत कोरडे ओढले. ऐसे कैसे झाले भोंदू। कर्म करुनी म्हणती साधू।।' आज अनेक बाबा-बुवा तुरुंगाची हवा खात आहेत. चारशे वर्षांपूर्वी तुकोबांनी हा इशारा दिला होता. छत्रपती शिवरायांच्या आणि स्वराज्याच्या रक्षणासाठी देवाचा धावा करताना फुटो हे शरीर, तुटो हे मस्तक। नामाचा गजर सोडू नये।।' असे त्यांनी जनमानसाला प्रेरित केले. तुम्ही संन्यास न घेता क्षत्रिय धर्माचे पालन करा,' असा विनवणीवजा उपदेश करणारे तुकोबा खऱ्या अर्थाने जगद्गुरू आहेत. ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।। तुका झालासे कळस । भजन करू सावकाश ।।

जनमानस

डिजिटल व्यवहार करताना सावधगिरी बाळगणे आवश्यक

ऑनलाईन, डिजिटल आणि डेबिट,क्रेडिट कार्डस् यांच्या वापरांमुळे देशातील लोकांचे आर्थिक व्यवहार सोपे आणि लोकप्रिय होत आहेत. तशीच त्यांच्यामार्फत केलेल्या व्यवहारांची संख्या वाढत आहे. मात्र त्याच डिजिटल व्यवहारांच्या माध्यमातून सायबर गुन्हेगार लोक नागरिकांची फसवणूक करण्याच्या संधी मोठया प्रमाणात साधत आहेत.

माहितीच्या अधिकारात ऑनलाईन, डिजिटल आणि डेबिट - क्रेडिट कार्डस् यांच्याशी निगडित फसवणुकीच्या प्रकरणांची सन २०१४ पासूनची मागितलेली आकडेवारी देताना रिझर्व्ह बँकेने एटीएम वा डेबिट कार्डशी निगडित फसवणुकीच्या १४०,७३६ घटनांतून ५०७.१२ कोटी रुपयांची फसवणूक आणि क्रेडिट कार्डस् शी निगडित १३७,२३७ प्रकरणांतून ५१४.९० कोटी रुपयांची फसवणूक तर इंटरनेट बँकिंगच्या माध्यमातून ६१,५६१ प्रकरणांतून ३५४.७८ कोटी रुपयांची फसवणूक केली गेली अशी माहिती दिली. आर्थिक देवाण घेवाणीच्या व्यवहारांत रोकड बाळगण्याची भिती घालविणे, व्यवहारांत गती आणि पारदर्शकता आणण्यासाठी सुरू केलेल्या या पद्धतींना सुरुवातीस प्रोत्साहन दिले गेले. वापरकर्त्यांनीं डिजिटल व्यवहारांबद्दलच्या जुजबी ज्ञानाच्या जोरावर वापर करून व्यवहारांना सुरुवात केली

खरी, मात्र डिजिटल प्लिकेशन्सच्या संपूर्ण माहितीअभावी लाखो वापरकर्ते सायबर गुन्हेगारांच्या फसवणुकीला बळी पडू लागले. २०१४- १५ मध्ये ७१ प्रकरणांत फसवणूकीचे प्रकार झाले. विदेशी तपास यंत्रणांच्या सहाय्याने देशाबाहेरील गुन्हेगारांवर वचक राहिल याची दक्षता घेण्याची गरज आहे. डिजिटल व्यवहार करणाऱ्या नागरिकांनी रिझर्व्ह बँक, डिजिटल सेवा कंपन्या यांच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केल्यास सायबर गुन्ह्यांचे प्रमाण कमी होत जाईल.

- स्नेहा राज

रोजगार निर्मितीचा क्षमता असलेला मध उद्योग

मध अत्यंत शक्तीवर्धक आहे. अनादिकाळापासून मधाचा पौष्टिक अन्न व औषध म्हणून उपयोग होत आला आहे. पोळे जाळून पिळून मध गोळा करण्याच्या परंपरागत पद्धतीमुळे मधमाशांचा व पोळ्यांचा नाश होतो. तसेच मध खराब प्रतीचा व लवकर खराब होणारा होतो. सन १९४६ मध्ये महाबळेश्वर येथे मधमाशापालन केंद्रामध्ये आधुनिक संशोधन केल्यामुळे मधमाशा व त्यांच्या पोळ्यांचा नाश होत नाही व पोळी पुन्हा पुन्हा वापरता येतात. यामुळे पोळी बांधण्यासाठी मधमाशांचा खर्च होणारा वेळ, श्रम व अन्न याची बचत होते. फक्त मध मधुकोटीतून काढल्यामुळे उच्च प्रतीचा शुद्ध व अहिंसक मध मिळतो.

राज्यातील सर्व भागातील व प्राधान्याने डोंगराळ व जंगल विभागातील मधपाळांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाअंतर्गत मध उद्योग विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. मंडळामार्फत मधमाशा पालन उद्योगासाठी मध केंद्र योजना व अर्थसहाय्य / अनुदान ही योजना राबविले जाते. मंडळामार्फत या उद्योगाचे प्रशिक्षण देण्यात येते व सवलतीच्या दरात मध पेट्यांचा, मध यंत्राचा पुरवठा करण्यात येतो. तसेच या उद्योगांतर्गत उत्पादन, संशोधन, मध प्रक्रिया, विक्री, राणी माशी पैदास इत्यादि कार्यक्रमही मंडळामार्फत हमी भावाने हाती घेण्यात येतात. तसेच मधपाळांनी उत्पादित केलेले मध खरेदी करून तो मधुबन या ब्रँडने विक्री केला जातो. याबाबत मध पर्यवेक्षक प्रभाकर पलवेंचा यांनी अधिक माहिती दिली.

ते म्हणाले, चालू आर्थिक वर्षामध्ये विविध तालुक्यातील १३ प्रगतशील मधपाळांचे प्रशिक्षण घेण्यात आले. १३ प्रगतशील मधपाळ व २ केंद्रचालक यांना ५० टक्के अनुदानावर मधपेट्या, वसाहत व इतर साहित्य पुरवठा करण्यात आला. प्रगतशील मधपाळांना ५० मधपेट्या ५० टक्के अनुदानावर देण्यात आल्या. लाभार्थींनी मंगळवेढा

तालुक्यामध्ये सूर्यफुलामध्ये मधपेट्या ठेवून ९०० किलो मधउत्पादन केले आहे. मधउद्योग हा एक नमुनेदार ग्रामोद्योग असून, त्यासाठी जागा, इमारत, वीज, पाणी यासाठी गुंतवणूक नाही. रोजगार निर्मितीची उत्तम क्षमता असून, वाया जाणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचा चांगला उपयोग केला जातो.

पाळता येणाऱ्या जातीच्या माशा (सातेरी मेलिफेरा), मधमाशांना उपयुक्त असा मकरंद व पराग देणाऱ्या वनस्पतींची उपलब्धता व त्यांच्या फुलोऱ्याचे सातत्य, मधमाशांना हाताळण्याचे व त्या उद्योगातील विविध तंत्राचे ज्ञान प्रशिक्षण, प्रमाणित व योग्य उपकरणांचा पुरवठा, मधमाशांचे रोग, शत्रू व त्यांच्या नियंत्रणाची माहिती या बाबी मधउद्योगासाठी आवश्यक आहेत. महाराष्ट्र शासनाने दिनांक १८ जून २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मध केंद्र योजना (मधमाशा पालन) संपूर्ण राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. मधमाशा संरक्षण-संवर्धनासाठी जनजागृती व प्रसार-प्रचार, निःशुल्क प्रशिक्षण व कौशल्य विकास, ५० टक्के अनुदानावर साहित्य वाटप, उत्पादित मधाची मंडळामार्फत खरेदी हमी, उपउत्पादने तयार करण्यासाठी विशेष प्रशिक्षण, उपउत्पादने तयार करणेसाठी ५० टक्के अनुदानावर साहित्य वाटप, मंडळातर्फे उपउत्पादनांच्या खरेदीची हमी, विशेष छंद प्रशिक्षणाची सुविधा ही मधकेंद्र योजनेची वैशिष्ट्ये आहेत.

खालीलप्रमाणे प्रशिक्षण दिले जाते.

अ) प्रगतीशील मधपाळ व प्रशिक्षण (केंद्रचालक) - केंद्रचालक, मधपाळ. यांना मध संचालनालय महाबळेश्वर येथे २० दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्यात येते.ब) मधपाळ प्रशिक्षण : वैयक्तिक शेतकरी अर्जदार यांना मध संचालनालयामार्फत जिल्ह्याच्या किंवा स्थानिक ठिकाणी १० दिवसाचे निवासी प्रशिक्षण देण्यात येते.

क) मधमाशा पालन छंद प्रशिक्षण: शेतकरी, शाळा, कॉलेज, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, शासकीय सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांना मधमाशा पालन एक छंद म्हणून ५ दिवस मुदतीचे छंद प्रशिक्षण देण्यात येते.

मधुमक्षिका पालन अर्थसहाय्य : योजने अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थींना मधमाशा पालन उद्योगासाठी लागणारे मधपेट्या व इतर साहित्याच्या स्वरुपात ५० टक्के टक्के अनुदान देण्यात येते. व उर्वरित ५० टक्के स्वगुंतवणूक लाभार्थींने करणे आवश्यक आहे. मध खरेदी केंद्रचालक व मधपाळ या मधमाशापालन उद्योजकांनी उत्पादित केलेला मध व मेण मध संचालनालयामार्फत हमी भावाने खरेदी केला जातो.

(जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर)

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.

इब्राहिमपूर येथे श्री महांतेश्वर यात्रेनिमित्त आज रथोत्सव

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील इब्राहिमपुर विरक्त मठाच्या वतीने श्री महांतेश्वर यात्रा महोत्सव निमित्यविविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन आज गुरुवार दि ३० मार्च रोजी संध्याकाळी रथोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यायात आले आहे. श्री म नि प्र . अभिनव शिवलिंग महास्वामीजी विरक्तमठ मादनहिप्परगा म.नि.प्र. माहंत महास्वामीजी विरक्तमठ मैंदर्गी, श्री.म.नि.प्र. बसवलिंग महास्वामीजी विरक्तमठ अक्कलकोट श्रीम नि.प्र.डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामीजी विरक्त मठ नागणसुर, श्री षः ब्र.ब. विरमंहात शिवाचार्य महांतेश्वर मठ चिणमगेरी श्रीमः नि.प्र. मरूळसिध्द महास्वामीजी उवतेश्वर विरक्तमठ माडयाळ यांच्या दिव्य सानिध्यात विविध धार्मीक कार्यक्रम आशिर्वचन होणार आहे. याचा भाविक भक्तानी लाभ घ्यावा, असे आवाहन इब्राहिमपुर ग्रामस्थाच्या वतीने केले आहे.

क्रांती नगरात निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याची वंचितची तक्रार

मोहोळ : मोहोळ येथील क्रांती नगरात चार वेगवेगळ्या रस्त्याचे सिमेंट काँग्रेस करण्याचे काम चालू असूनही ते काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असलेल्या बाबतची तक्रार वंचित बहुजन आघाडीचे मोहोळ शहर अध्यक्ष रमेश शिंदे यांनी मोहोळनगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ योगेश डोके यांना निवेदन देण्यात आले आहे. मोहोळ शहरातील क्रांतीनगर परिसरातील माळीयर ते खरात घर ,काळे मुजावर घर शिंदे घर, गायकवाड घर ते मुळे घरापर्यंत सिमेंट काँक्रेट रस्त्याचे काम सुरू करण्यात आले कामाच्या इस्टिमेट प्रमाणे काम करणे गरजेचे असताना तसे न करता खोदकाम ही केले नाही सरळ खडीकरण करण्यास सुरुवात केली.

इस्टीमेट मध्ये सुरुवातीसच रस्त्याचे खोदकाम त्यानंतर मुरुमीकरण त्यानंतर खडीकरण हे सर्व झाले नंतर सिमेंट कॉक्रीट करावयाचे आहे असे त्यांनी मुख्याधीकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. हे काम चुकींचे आणि निकृष्ट होत आहे हे संबंधीत अधिकारी बागल याच्या निदर्शनासही आनून दिले परंतु त्यांनी याकडे दुर्लक्ष केले असल्याचे शिंदे यांनी प्रतिनिधीला सांगीतले व हे काम थांबवण्याची विनंतीही केली परंतु न जुमानता बागल यांन काम चालु ठेवण्यास प्रोत्साहन दिल आहे त्यामुळे त्यांनी चालू कामाच्या फोटोसह मुख्याधिकारी डॉ योगेश डोके याना निवेदन दिले असून निवेदनाची दखल न घेतल्यास वंचित बहुजन आघाडीच्या वतीने आंदोलनाचा इशाराही देण्यात आला .या निवेदनावर मोहोळ शहर अध्यक्ष रमेश शिंदे जिल्हा सल्लागार पोपट सोनवणे जिल्हा उपाध्यक्ष तुकाराम पारसे यांचे सह पदाधीकाऱ्यांच्या सहया आहेत आता मुख्याधिकारी काय भूमीका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

गुंजेगावच्या सरपंचावर अविश्वास ठराव दाखल

सोलापूर : गुंजेगावच्या सरपंच सफलता प्रभाकर पाटील यांच्या विरोधात सात सदस्यांनी बुधवारी दुपारी अविश्वास ठराव दक्षिण सोलापूर तालुक्याचे तहसीलदार अमोल कुंभार यांच्याकडे दाखल केला. बुधवारी गुंजेगाव ग्रामपंचायतच्या ९ सदस्यांपैकी सदस्य मीरा साळुंके, अंजना जाधव, पार्वती जाधव, शंकर पवार, किरण आठवले, तुकाराम भडकुंबे, संतोष मोटे या सात जणांनी सरपंच सफलता पाटील यांच्या विरोधातील अविश्वास ठरावाचे पत्र आपल्या सह्या करून तहसीलदार कुंभार यांच्याकडे दाखल केले. तहसीलदार कुंभार यांनी ५ एप्रिल २०२३ रोजी दुपारी गुंजेगाव ग्रामपंचायतमध्ये विशेष सभा काढली आहे. तहसीलदारांनी या सात सदस्यांसह सरपंच सफलता प्रभाकर पाटील, वर्षा भडकुंबे यांना नोटीस काढण्याच्या सूचना प्रशासनाला केल्या आहेत. हा अविश्वास ठराव दाखल करायला सात सदस्य आल्याचे कळताच सरपंचांच्या दिराने एकाच्या अंगावर दक्षिण तहसील कार्यालयासमोरच गाडी घालण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा होती. त्यामुळे तहसीलदार कुंभार यांनी तातडीने पोलिसांना पाचारण करून बंदोबस्तात या सदस्यांना रवाना केल्याची माहिती मिळाली. तसेच गुंजेगाव हे राजकीय दृष्ट्या संवेदनशील असल्यामुळे ग्रामसभे दिवशी ही गोंधळ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्या दिवशी ही मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

लोकांमध्ये तणाव ही एक मोठी समस्या : डॉ. शहा

सोलापूर : सातत्याने वाढणाऱ्या ताणाचा स्तर पाहता हिमालया वेलनेस कंपनी या भारतातील आघाडीच्या वेलनेस ब्रॅन्ड ने त्यांच्या नवीन मोहिमेची सुरुवात केल्याची घोषणा केली. डॉ. संजीव शहा यांनी सांगितले कि, अनेक लोकांमध्ये तणाव ही एक मोठी समस्या असते.तणावाचे जर व्यवस्थापन झाले नाही तर त्याचा नकारात्मक परिणाम हा लोकांच्या आरोग्यावर होत असतो, म्हणूनच अश्वगंधा मुळे जुन्या तणावामुळे निर्माण होणाऱ्या जीवनशैलीच्या आजारांपासून बचाव करण्यास मदत होते.

अदानी-मोदी प्रकरणावरुन लक्ष हटविण्यासाठी गांधींवर कारवाई

आ. प्रणिती शिंदे यांचा आरोप; शहर काँग्रेसचे सत्याग्रह आंदोलन

सुराज्य/सोलापूर

भारत जोडोच्या माध्यमांतुन राहुल गांधी जनतेचे प्रश्न सतत मांडत आहेत. त्यांची वाढणारी लोकप्रियता आणि मोदी- अदानी भ्रष्टाचार प्रकरणावरुन संसदेत आणि संसदेबाहेर सातत्याने आवाज उचलत आहेत. देशातील लोकांचा पैसा बुडवून पळून गेलेल्या अनेक उद्योगपती मोदींच्या नावावरुन राहुल गांधी यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून शिक्षा केली. आणि लगेच त्यांची खासदारकी रद्द करून त्यांना घर ख़ाली करण्याची नोटिस देण्यात आली. असे करून राहुलजी गांधी आणि विरोधकांचा आवाज बंद करण्याचा प्रयत्न करत आहेत, अदानी - मोदी प्रकरणावरुन लक्ष हटविण्यासाठी गांधींवर कारवाई करण्यात आल्याचा आरोप आ. प्रणिती शिंदे यांनी केला.

सोलापूर शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने हुकूमशाही मोदी सरकारने गांधी यांची खासदारकी रद्द केल्याच्या निषेधार्थ आणि त्यांच्या समर्थनार्थ आमदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली रेलवे स्टेशन जवळील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ तोंडाला काळी रिबीन बांधून मूक सत्याग्रह आंदोलन केले. त्यावेळी आ. शिंदे बोलत होत्या. आ. शिंदे म्हणाल्या, राहुल गांधी यांनी सत्य परिस्थिती सांगितली महागाई, बेरोजगारी विरुध्द आवाज उचलले एक सामान्य माणसाने, विरोधकांनी जे केले पाहिजे तेच त्यांनी केले. त्यामुळे मोदींना असुरक्षिता वाटत आहे त्यांचा अहंकार दुखावला गेला. मोदी सरकार घाबरून गेले आहेत.

आम्ही राहुल गांधी यांनी डरो मत चा संदेश दिला असून देशभरातील काँग्रेस कार्यकर्ते मोदी सरकारच्या हुकूमशाही विरुध्द लढा चालू ठेवतील.

यावेळी शहराध्यक्ष चेतन नरोटे, महिलाध्यक्ष हेमा चिंचोळकर, कार्याध्यक्ष संजय हेमगड्डी, प्रदेश चिटणीस ॲड मनीष गडदे, चाकोते, सुशीला आबुटे, सुदीप आरिफ शेख, तौफीक हत्तुरे, शिवा बाटलीवाला, विनोद भोसले, वैष्णवी करगुळे, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, अंबादास करगुळे, देवाभाऊ गायकवाड, लक्ष्मीकांत साका, भीमाशंकर टेकाळे, बसवराज म्हेत्रे, विश्वनाथ साबळे, अश्विनी जाधव, राजन कामत, हाजी मैनुद्दीन शेख, प्राजक्ता घाटे, लता सोनकांबले, शुभांगी लिंगराज, अशोक सायबोलू, श्रीकांत दासरी, मनोहर सालुंखे, अजिक्य पाटील, दीपक फुले, मनोहर चकोलेकर, श्रीशैल रनखांबे, सुनीता बेरा यांच्यासह इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

७ तास लाठी चालविण्याचा गार्गी चव्हाणने केला विक्रम

सुराज्य/सोलापूर

येथील राजर्षी शाहू विद्यालयाची पाचवीतील अकरावर्षीय विद्यार्थीनी गार्गी चव्हाण हिने सलग ७ तास ७ मिनीटे ७ सेकंद लाठी चालविण्याचा विश्वविक्रम केल्याबद्दल मराठा समाज सेवा मंडळातर्फे संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे यांच्या हस्ते तिचा २१ हजार रूपये रोख बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.

विक्रमाचे सपाटे यांनी कौतुक करून गार्गी चव्हाण हीने स्वत: बरोबर शाळेचे नाव उज्वल करेल असा विश्वास व्यक्त केला.

गार्गी हिने नुकताच शिवस्मारक मैदानात हा विक्रम केला असून याबद्दल तिची शिवस्मारक ते छत्रपती शिवाजी प्रशाले पर्यंत वाजत गाजत मिरवणूकही काढण्यात आली.

यावेळी प्रा.महेश माने, विनायक पाटील, महानंद सोलापुरे, सुजाता जुगदार, माधवी कांबळे, उषा गोकुळे, नंदा चव्हाण, ज्योती चोपडे, दत्तात्रय सुतार, संतोष अलकुंटे, संतोष गवळी, मारूती घोडके, उदयसिंग पवार, सोमनाथ बचुटे, दत्ता भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

दहिटणेवाडी येथील ग्रामदैवत श्री जागृत हनुमान यात्रा महोत्सवास आजपासून प्रारंभ

सुराज्य/अक्कलकोट

तालुक्यातील दहिटणेवाडी येथील ग्रामदैवत श्री जागृत हनुमान यात्रा- महोत्सवानिमित्त गुरुवारी दि.३० मार्चपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

परमपूज्य गुरुवर्य कै. सावताबाबा जांभळे व पांडुरंग महाराज (गाणगापूर), कै. विठ्ठलपुरी मधुपरी महाराज यांच्या आशीर्वादाने व बार्शी भजन मंडळ आणि मराठी भजन मंडळ यांच्या सहकार्याने गुरुवारी (द.३०) मार्च पासून ते शुक्रवार (दि. ७ एप्रिल) पर्यंत हनुमान जयंती निमित्त भजन, भारुड, गौळणी व प्रवचन होणार आहेत. गुरुवारी (दि.३०) ह.भ.प. शिवाजी पवार (सोलापूर) यांचे किर्तन होणार आहे. ह.भ.प. वंदना खरात व छाया खरात (औज) व वादक बाबा पाटील (कुरनुर) यांचे हरीजागर होणार आहे. शुक्रवारी (दि.३१) ह.भ.प. किरण अष्टे (बार्शी) यांचे किर्तन होणार आहे. श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे मुख्य पुजारी ह.भ.प. अण्णू महाराज पुजारी व जय भवानी भजन मंडळ (मराठवाडी) चे हरीजागर होणार आहे. शनिवारी (दि.१) एप्रिल ह.भ.प. महेश चव्हाण (बार्शी) यांचे किर्तन होणार आहे व कुरनुर महिला भजनी मंडळ यांच्या वतीने हरीजागर होणार आहे.रविवारी (दि.२) ह.भ.प. शुभम जगताप (बार्शी) यांचे किर्तन होणार आहे, व विठ्ठल भजन मंडळ (सरसंबा) यांच्या वतीने हरीजागर होणार आहे. सोमवारी (दि.३) ह.भ.प. मनोज खालाटे (वडजी) यांचे किर्तन होणार आहे, व जय हनुमान भजन मंडळ (वडजी) यांच्या वतीने हरीजागर होणार आहे. मंगळवारी (दि. ४) ह.भ.प. शरद चुंगे (वडगांव) यांचे किर्तन होणार आहे, व राऊत भजन मंडळ (बार्शी), जय हनुमान भजन मंडळ (कोळेकरवाडी) यांच्या वतीने हरीजागर होणार आहे. बुधवारी (दि. ५) ह.भ. प. कृष्णात काकडे (आळंदी) यांचे किर्तन होणार आहे, व जय हनुमान भजन मंडळ (बार्शी) व भारुडकार दिनकर व व्यंकट यांच्या वतीने हरीजागर होणार आहे. गुरुवारी (दि.६) श्री हनुमान जयंती निमित्त पूजा, अभिषेक होणार आहे. शुक्रवारी (दि.७) एप्रिल दुपारी १२.३० वाजता ह.भ.प. पांडुरंग महाराज गाणगापूर व ह. भ.प. पांडुरंग जांभळे महाराज यांच्या हस्ते गोपाळकाला ने यात्रा उत्सवाची सांगता होणार आहे

सासरच्या लोकांकडून विवाहितेचा छळ

सुराज्य/सोलापूर

लग्न झाल्यापासून नवऱ्यासह सासू-सासरे, जाऊ पैशासाठी वारंवार विवाहितेला मारहाण करत तुझा घरात राहण्याचा काही एक संबंध नाही.तु घरातून निघून जा असे म्हणून अपमानित करून शिवीगाळ करून घरातून हाकलून दिल्याप्रकरणी पीडित विवाहित महिलेने सासरकडील मंडळींच्या विरोधात फौजदार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सासरकडच्या लोकांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी धानेश्वरी संजय रेशमी (वय-३८, रा.बसवबडवणे, लेडीज हॉस्टेलजवळ, विजापूर, सध्या : दक्षिण कसबा, सोलापूर) यांचा २०१३ साली संजय संगाप्पा रेशमी यांच्याबरोबर लग्न झाले होते. लग्न झाल्यापासून हा जाचहाट सुरूच होती. त्यामुळे पती संजय संगप्पा रेशमी यांच्यासह सासू सुवर्णा संगप्पा रेशमी, सासरे संगप्पा अण्णप्पा रेशमी, जाऊ संगिता सचिन रेशमी (सर्व.रा. विजापूर राज्य कर्नाटक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार कामूर्ती करत आहेत.

तेल अंगावर पडल्याने पती भाजला

राहत्या घरी सणानिमित्त तेलात समोसा तळत असताना गरम तेल उजव्या हातावर पायावर पडल्याने पती गंभीर भाजला. नई जिंदगीत राहणारे अक्रम आझाद शेख (वय-४०) हे काल सणानिमित्त घरी समोसा तळत होते.अचानक तेल हाता-पायावर पडल्याने ते जखमी झाले. उपचाराकरता पत्नीने त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकी झाली आहे.

पानपट्टीतून अडीच हजारांचा गुटखा जप्त

शहरातील पानपट्टीवर अन्न औषध प्रशासनाकडून कडक कारवाई करण्यात येत आहे. यात मरिआई चौक व भैय्या चौक येथील दोन पानपट्टी मधून अडीच हजारांचा गुटखा व सुंगधित सुपारी जप्त करण्यात आली आहे. याबाबत अन्न औषध प्रशासनाचे रेणुका पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दीपक रमेश पाटील (रा.मरिआई चौक) याच्यावर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात व प्रज्ञा सुरसे यांच्या फिर्यादीवरून चंदन विठ्ठलसिंग चव्हाण (रा.भैय्या चौक) याच्यावर सदर बाझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

कारखान्यासमोर लावलेली दुचाकी पळवली

टेक्सटाईल कारखान्यासमोर हॅन्डल लॉक करून लावलेली दुचाकी क्र.एमएच.१३.बी एक्स.७०३५ ही अज्ञात चोराने चोरली.याबाबत नरेश कृष्णहरी जिल्ला (वय-३७, रा.दत्त नगर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलीस हवालदार पाटील करत आहेत.

व्यंकटेश विद्यालयातर्फे गीत रामायण

सुराज्य/सोलापूर

व्यंकटेश संगीत विद्यालयात दि. ३० रोजी गुरुवारी सायंकाळी साडेपाच वाजता गीत रामायण या क्रमाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. .हा कार्यक्रम गुरुवार दिनांक ३० मार्च रोजी लोकमान्य टिळक सभागृह ॲम्पी थिएटर सोलापूर या ठिकाणी सायंकाळी साडेपाच वाजता होणार आहे .हा कार्यक्रम विद्यालयातील विद्यार्थी गायन व वादन करणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे तरी सोलापुरातील कार्यकर्त्यांनी प्रेमींनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन वेंकटेश संगीत विद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे. जास्तीत जास्त लोकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन विद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

झेंडा फाटण्याच्या कारणावरून जमाव जमवून गोंधळ

सुराज्य/सोलापूर

कीर्ती नगर मल्लिकार्जुन नगर जवळील तुळजाभवानी चौकातील अक्कलकोट रोड येथे कट्ट्यावर असलेला लोखंडी खांबास झेंडा फाटण्याच्या कारणावरून विठ्ठल अमोगसिध्द चाबुकस्वार राजकुमार शिवशेट्टी, सैपन बंदेनवाज शेख, रफिक नदाफ व त्यांचे इतर चार अनोळखी इसमाने बेकायदेशीर जमाव जमवून गोंधळ करत असताना मिळून आल्याची फिर्याद पोलीस हेडकॉन्स्टेबल निलेश ज्ञानेश्वर साळुंखे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.

ही घटना दि.२८ मार्च रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

सा.आ.अ/जलवितरण
जा.क्र.-१५८०
दि.२८/०३/२०२३

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
सार्वजनिक आरोग्य अभियंता
जलवितरण विभाग
जाहिर प्रसिद्धीकरणाचा मसुदा

सोलापूर महानगरपालिकेकडील मुख्य कार्यालयाकडील सन २०२२- २३ मा.आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत पाण्याची पाईपलाईन घालणे कामाचे ई-निविदा बाबत.
Tender ID - 2023-SMC-888474-1
या कामाचे टेंडर शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.२९/०३/२०२३ सकाळी १०.०० वा. पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
सहाय्यक अभियंता (जलवितरण)
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

मोहोळच्या परीने गाजवले शिर्डी प्रदर्शन; सोलापूर जिल्ह्यातील ५ जनावरांना पारितोषिक

सुराज्य/विरवडे(बु)

शासांच्या पशुसावर्धन विभागामार्फत (शिर्डी, ता.राहता, जि. अहमदनगर) येथे २४ते २६ या दरम्यान महापशुधन एक्सपो २०२३चे आयोजन करण्यात आले होते, या प्रदर्शनामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून विविध प्रकारची जनावरे आली होती यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ५ जनावरांना विविध गटातून पारितोषक मिळाली आहेत .

या मधे मोहोळ तालुक्यातील विरवडे बु येतील सुनिल बाळासाहेब पवार यांची खिंलार गाय परीला पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मिळाला. तर पंढरपूर तालुक्यातील सिध्देवाडी येतील रामचंद्र जाधव यांच्या खिंलार बैल राजा हा प्रदर्शन मध्ये चॅम्पियन ठरला तर पंढरपूर तालुक्यातील आंबे येथील समाधान आदटराव यांच्या पंढरपुरी महशीला मैदान चॅम्पियन पुरस्कार मिळाला तसेच पंढरपूर तालुक्यातील कवठाळी येतील अभिमान नागटिळक यांची खिंलार कालवड राधा हिने झुळूक गटात पारितोषिक मिळवले आहे तर सांगोला तालुक्यातील कडलास येतील नामदेव पवार यांच्या बैलाने चॅम्पियन पारितोषिक मिळवले आहे.

या प्रदर्शनामध्ये सोलापूर जिल्ह्यातून ५२ जनावरांनी भाग घेतला होता यात ३७ खिंलार, १५ पंढरपुरी म्हशींचा समावेश होता. सर्व सहभागींसोबत पशुसंवर्धन विभाग अधिकारी डॉ सचिनकुमार मोरे यांची उपस्तिती होती. शिर्डी येतील शेती महामंडळाच्या ४६एकर जागेवर एक्सपो २०२३ भरवण्यात आला होता.

शासनाने लंपे नियंत्रणासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. सप्टेंबर २०२३ परेंत लंपी लस निर्मिती करणारे महाराष्ट हे पाहिले राज्य ठरणार आहे. पशधन वाढले पाहिजे, जोपासले पाहिजे,यासाठी शेतकऱ्यांनी व पशुसंवर्धन विभागाने नवनवीन प्रजातीची माहिती प्राप्त करणे गरजेचे आहे

-एकनाथ शिंदे
(मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य)

परिशिष्ट- ब-२
कार्यालयाचे नांव :- नातेपुते नगरपंचायत
सूचना

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) च्या अनुषंगाने कलम २३ (१) नुसार नातेपुते नगरपंचायत क्षेत्राची विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करणेबाबत.
जा.क्र. ३०३. दि २९/०३/२०२३

शासनाने नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. एमयुएन-२०१९/प्र.क्र. ६६/नवि-१८ दि ०३/०८/२०२१ अन्वये नातेपुते /नगरपंचायत स्थापन केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) अन्वये नगरपंचायत क्षेत्राचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी त्या क्षेत्राची विकास योजना तयार करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) अन्वये नातेपुते नगरपंचायतीने विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ०१ दि. २९/०९/२०२२ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरची सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २१ (२) व नुसार नगरपंचायतीच्या विकास योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राची हद्द दर्शविणारा नकाशा नगरपंचायतीच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेला आहे.

ज्या नागरिकांच्या या बाबत काही सूचना/हरकती असतील त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द होईल त्या तारखेपासून ६० (साठ) दिवसाच्या आत राजपत्रात मुख्याधिकारी नातेपुते नगरपंचायत यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात. विकास योजना तयार करतांना त्या सूचनां/ हरकतींचा योग्य तो विचार करण्यात येईल.
ठिकाण : नातेपुते

सही/-
मुख्याधिकारी,
नातेपुते नगरपंचायत नातेपुते
शिक्का

"Shedule-B-1"
Office Name:- Natepute Nagar panchayat
NOTICE

Declaration of Intenton to prepare Development Plan of Natepute Nagar panchayaf as eection 23(1) read with section 21(2) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

Outward No:- 303 Date 29-03-2023

Govermnent of Maharashtra in Urbarn Development Department, vide it's Notification No MUN-2019/P.R.66/UD-18 dated 03-08-2021 constituted Natepute Nagar panchayat. It is necessary to prepare the Devclopment Plan for the area of Natepute Nagar panchayat as per section 21(2) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for planned development of the said area.

Hence, the Natepute Nagar panchayat by its resolution No.01 dated 29-09-2022 has given consent to declare its intention to prepare Development Plan, as per provision of section 23(1) read with section 21(2) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, this notice is being published.

The plan showing boundary of the area included in Development Plan Natepute Nagar panchayat is kept open for inspection by the public on office working days, during office hours at the office of the Natepute Nagar panchayat, as tequired under section 23(2) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966.

Any suggestion/objection of the public in this regard, may be forwarded in writing to the Chief Officer Natepute Nagar panchayat within a period of 60 (Sixty) days from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette. The suggestion/ objection shall be duly considered while preparing the Development Plan.
Place: Natepute

Sd/-
Chief Oficer.
Natepute Nagar
Panchayat Natepute
stamp

कुर्डुवाडी नगरपालिकेच्या निवडणुका लांबल्याने इच्छुकांचे मालमत्ता कर भरण्याकडे दुर्लक्ष

✔ सुराज्य/कुर्डुवाडी

कुर्डूवाडी नगरपालिकेवर गेल्या सव्वा वर्षापासून निवडणुका लांबल्या असल्यामुळे इच्छुक उमेदवारांनी व माजी नगरसेवकांनी मालमत्ता कर भरण्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसत असून प्रशासन करवसुलीकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप होत आहे. आत्तापर्यंत एकूण ३ कोटी ७४ लाख ९ हजार ४४७ रुपयांची वसुली झाली असून अद्याप २ कोटी ६९ लाख २ हजार १०६ रुपये थकबाकी वसूल झाली नाही.

या थकबाकीदारांत सर्वसामान्यांबरोबर, मोठे व्यापारी, माजी नगरसेवक, शालेय संस्था, शासकीय कार्यालय, व्यापारी संकुलातले काही गाळे तर शहरातील मोठ्या व्यवसाय करणाऱ्याचे मालमत्ता कर अद्याप भरले नाहीत प्रशासनाने आत्तार्पयत ५८.१७ टक्के करवसुली केली असून अद्याप ४१.८३ टक्के करवसुली बाकी आहे.

निवडणूक लांबल्यामुळे अनेक आजी, माजी, इच्छुक उमेदवारांनी अद्याप आपली थकबाकी पूर्ण केली नसून तसेच त्यांच्यासाठी जे नेहमी अनुमोदक व सूचक म्हणून धरपडणारे थकबाकीदारांनीही आपली बाकी अद्याप तशीच ठेवली असून ज्यावेळी निवडणुका जाहीर होतील त्यावेळी इच्छुक उमेदवार स्वतः सह आपलीही थकबाकी भरेल असे या थकबाकीदारांना वाटत आहे आणि यापूर्वी तसे झाले ही आहे .अनुमोदक आणि सूचक तयार करताना आपल्या जवळील न बदलणारा माणूस असावा लागतो. त्यामुळे अनुमोदक आणि सूचकही आपली उपयोगिता लक्षात घेऊन जाणीवपूर्वक थकबाकी ठेवतात.नेमके गेल्या सव्वावर्षापासून नगरपालिकेवर प्रशासक असून निवडणूक वरचेवर लांबत चालल्यामुळे नगरपालिकेलाही प्रशासन काळात दोन मार्च अखेर मिळूनही हवी तेवढी वसुली करता आली नसल्याचे दिसत आहे.

थकबाकी--

संकलित कर -- ७९ लाख ९० हजार ७३२
वृक्ष कर -- ४ लाख २७८५८
शिक्षण कर -- ३२ लाख ३७ हजार ४१६
रो.हमी -- ४ लाख ८४ हजार ७०८
पाणीपट्टी --१ कोटी ७ लाख ४७ हजार ९७१
स्वच्छता कर - ७ लाख १५ हजार ४९८
अ.कर--२ लाख २० हजार ४८४
दिवाबत्ती कर --२ लाख ३१ हजार ८७३
घनकचरा --२८ लाख ४५ हजार ७६६
एकूण थकबाकी -२ कोटी ६९ लाख २ हजार १०६.

नगरपालिकेवर सत्ताधाऱ्यांचा अंकुश असतो तोवर प्रशासनाला अनेक अडथळ्यांची शर्यत पार करून आपले कर्तव्य बजावावे लागत असते. मार्च अखेर प्रशासन ज्यावेळी मालमत्ताधारकांकडे कर वसुलीसाठी तगादा लावत असते त्यावेळी अनेक मालमत्ताधारक नेत्यांचा आश्रय घेऊन पळवाटा काढत असतात. नेते मंडळीही अशावेळी आपला मतदार, नातेवाईक, मित्र पाहून प्रशासनाला डोळेझाक करण्यास सांगतात प्रसंगी नगरपालिकेची थकबाकी वाढत जाते. नेत्यांनी अशा थकबाकीदारांना पाठीशी घातल्याने थकबाकीदारांना ही सवय लागून राहते.

त्यामुळे अनेकदा थकबाकी वाढूनही मालमत्ताधारक काही अंशी रक्कम भरून वेळ मारून नेतात. सध्या गेल्या पंधरा महिन्यापासून नगरपालिकेवर प्रशासक असूनही प्रशासनाला कोणाच्याही दबावाशिवाय काम करण्याची संधी असूनही म्हणावी तशी थकबाकी वसुली करता आली नाही.

वेळापूर येथे माने-देशमुख पुण्यतिथीनिमित्त सामाजिक उपक्रम

✔ **वेळापूर** : वेळापूर तालुका माळशिरस येथील वेळापूर विविध कार्यकारी सेवा संस्था कार्यालय येथे सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व माळशिरस पंचायत समितीचे माजी सभापती कै. सूर्यकांतदादा माने देशमुख यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माधवराव माने देशमुख हे होते. सुरुवातीला कै. सुर्यकांतदादा माने देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन दत्तात्रय बनकर, आनंदराव माने देशमुख, मधुकर रावसाहेब माने देशमुख, मधुकर इंगळे, विठ्ठल मुंगुस्कर ,शरद साठे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्रीधर देशपांडे यांनी केले. पाणपोईचे उद्घाटन पांडुरंगभाऊ माने देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कै. सूर्यकांतदादा माने देशमुख यांच्या जीवनावर उदय उरणे, अण्णासाहेब चव्हाण, प्रभाकर इंगळे सर देशमुख, कमलाकर माने देशमुख , डी एस गायकवाड ,गोपाळ यागें, गणेश चव्हाण आदींनी विचार व्यक्त केले या कार्यक्रमाला ज्येष्ठ नेते पांडुरंग भाऊ माने देशमुख , ट्रस्टचेअध्यक्ष अमृत भय्या माने देशमुख, वेळापूर विविध कार्यकारी सेवा संस्थेचे चेअरमन अमरसिंह माने देशमुख, व्हाईस चेअरमन महादेव भाऊ ताटे, बाळासाहेब जोशी, ग्रामपंचायत सदस्य अमृतराव माने देशमुख, दीपक आबा राऊत, शिवाजी पनासे, गायकवाड, तसेच दीपक चव्हाण, ओंकार माने देशमुख, युवराज राजे भोसले, मल्हारी मामा शिंदे, किसन बनकर, माजी उपसरपंच शंकरराव काकूळे, धनंजय माने देशमुख, शिवाजी मोहिते, शरद साठे, दिगंबर साठे, नितीन चौगुले, भैय्या इनामदार, रंगादादा माने, चंद्रकांत आडत, शरद साळुंखे, भैय्या मिरगे, गिरीश कुलकर्णी, महेश काळे पाटील,अभिजीत मेहेत्रे, माऊली म्हेत्रे, शंकर माने देशमुख, सतीश नवले, श्रीकृष्ण देशपांडे, अशोक साबळे, अमोल साठे, वेळापूर विविध कार्यकारी सेवा संस्थेचे सर्व संचालक, सूर्यकांतदादा पतसंस्थेचे चेअरमन व सर्व संचालक, संस्था सचिव भागवत मिले, शिवाजी आडत, संजय करमाळकर, अर्धनारी नटेश्वर महाविद्यालय वेळापूर चे सर्व शिक्षक वर्ग, व्यापारीवर्ग यावेळी उपस्थित होते. शेवटी सर्वांचे आभार सोसायटी व्हा.चेअरमन महादेव भाऊ ताटे यांनी मानले.

कडलास येथील अनुराधा पाटील यांना राज्यस्तरीय पुरस्कार

✔ **सांगोला** : सोलापूर येथे अविष्कार फाउंडेशन कोल्हापूर या संस्थेच्या वतीने यावतीने राज्यस्तरीय जिजाऊ पुरस्कार २०२३ हा पुरस्कार सामाजिक व शैक्षणिक राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना त्यांच्या कामास प्रोत्साहन मिळावे या उद्देशातून अविष्कार फाउंडेशन यांचे वतीने अनुराधा पाटील यांना पुरस्कार देण्यात आला त्यांच्या संस्थेस या अगोदर सीबीएस न्यूज मराठी यांच्यावतीने उत्कृष्ट संस्था तसेच त्यांच्या संस्थेतील कर्मचाऱ्यांना राज्यस्तरीय, राष्ट्रीय असे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांच्या या संस्थेच्या कार्याबद्दल त्यांनी केलेल्या शैक्षणिक योगदानामुळे त्यांना वरील पुरस्कार मिळाला. माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील, तसेच जिल्हा परिषद अध्यक्षा जयमालाताई गायकवाड तसेच संस्थेचे माजी अध्यक्ष बाबुराव गायकवाड यांच्या सहकार्यातून व त्यांच्या संस्थेतील सर्वच पदाधिकारी व प्रशालेचे मुख्याध्यापिका व सर्व स्टाफ यांनी त्यांना मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन अविष्कार फाउंडेशन कोल्हापूर या संस्थेने राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार देऊन सन्मानित केले दिनांक १९ मार्च २०२३ रोजी सोलापूर येथे हिराचंद नेमचंद वाचनालय या ठिकाणी त्यांचा सन्मानपूर्वक पुरस्कार देऊन कार्यक्रम झाला.

आंतरराष्ट्रीय कौशल्य महोत्सवासाठी इच्छुकांनी ९ एप्रिलपर्यंत नोंदणी करावी

✔ **सोलापूर** : कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, लॅमरिन टेक स्किल युनिव्हर्सिटी (ड्ढड्ढण) च्या सहकार्याने देशातील युवक युवतींना विविध क्षेत्रांमध्ये आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याकरिता आंतरराष्ट्रीय कौशल्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आवश्यक शैक्षणिक पात्रता धारण करीत असलेल्या सर्व इच्छुक उमेदवारांनी दि. ०९ एप्रिलपर्यंत https://kaushalmahotsav.nsdcdigital.org/International/Candidate/Candidate- Registration या लिंक द्वारे नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त सचिन जाधव यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे. पत्रकात म्हटले आहे, आंतरराष्ट्रीय कौशल्य महोत्सव हा विविध टप्प्यामध्ये आयोजित केला असून त्यामध्ये देशातील युवक युवतींचे समुपदेशन, विनामूल्य स्क्रीनिंग, उमेदवार आणि नियोक्ता नोंदणी, भाषा चाचणी, व्यापार चाचणी, संभाव्य उमेदवारांची निवड यासह उमेदवारांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण बाबींचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय कौशल महोत्सव या मेगा इंटरनॅशनल रिक्रूटमेंट ड्राईव्हमध्ये यूएसए, कॅनडा, यूके, युरोप, जिसीसी, पश्चिम आणि दक्षिण आशिया, जपान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि पूर्व आणि दक्षिण आशियातील आंतरराष्ट्रीय नियोक्ते सहभागी आहेत. सदर नियोक्त्या द्वारा ऑटोमेशन, लॉजिस्टिक, उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, परिधान, पर्यटन, आरोग्यसेवा, सेवा, आदरातिथ्य, सुविधा व्यवस्थापन, बांधकाम, अन्न आणि पेय, सागरी, कृषि आणि फलोत्पादन इ. क्षेत्रातील रोजगार संधीचा समावेश आहे. सदर क्षेत्रामधील शैक्षणिक पात्रता धारण करीत असलेल्या सर्व इच्छुक उमेदवारांनी दि. ०९ एप्रिल २०२३ पर्यंत https://kaushalmahotsav.nsdcdigital.org/International/Candidate/Candidate-Registration या लिंक द्वारे नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

मंगल राजेंद्र चौहान यांचे निधन

✔ **सोलापूर** : एसआरपीकॅम्प येथील मंगल राजेंद्र चौहान (वय ५५) त्यांचे हृदयविकाराच्या त्रीव झटक्यांनी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी असा त्यांचा परिवार आहे.

अजय सिंह पवार यांचे प्रमोशन मुंबईला वित्त नियंत्रक म्हणून बढती

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजयसिंह पवार यांची प्रमोशन होऊन बदली झाली आहे त्यांना महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण वरळी मुंबई येथे वित्त नियंत्रक या पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. पवार यांच्या बदल्यात अध्यापि दुसरा अधिकारी देण्यात आला आला नाही.

राज्याच्या वित्त विभागाने राज्यातील ३३ अधिकाऱ्यांच्या प्रमोशन पर बदल्या केल्या आहेत. त्यामध्ये अजयसिंह पवार यांचा समावेश आहे. यापूर्वी पवार हे सोलापूर महानगरपालिकेत मध्ये मुख्य लेखापरीक्षक होते त्यानंतर त्यांची बदली सन २०२१ मध्ये सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये मुख्य वित्त व लेखा अधिकारी या पदावर झाली. अतिशय प्रामाणिक अधिकारी म्हणून त्यांची प्रशासकीय पातळीवर ओळख आहे. यापूर्वी उपमुख्य लेखा वित्त अधिकारी म्हणून त्यांनी सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये काम पाहिले होते.

जीवनाचा आनंद घेण्यासाठी मन मोकळे ठेवा : हभप आफळे

डॉ. दबडे परिवाराकडून भागवत कथा सप्ताहाची गोपाळ काल्याने सांगता

✔ सुराज्य/सोलापूर

मनुष्याने जीवनाचा आनंद घेण्यासाठी आपले मन मोकळे ठेवले पाहिजे. कोणतेही ओझे,दडपण मनावर ठेवू नका असे आपल्या निरूपणातून हरिभक्त परायण चारूदत्त आफळे गुरूजी यांनी केले.

डॉ.राजीव दबडे आणि डॉ.माधुरी दबडे यांच्या कृष्णामाई हॉस्पिटलच्या वतीने आयोजित व्यास मुनींच्या सिध्दहस्ते लिखित भागवत पुराण कथा सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी ते बोलत होते. गोपाळ काल्याने या भागवत सप्ताहाची सांगता बुधवार दि. २९ मार्च रोजी करण्यात आली. आध्यात्मिक साधनेतून मनुष्याने

प्रगती साधली. साधनांच्या सोबत समय आणि सेवा मिळाले पाहिजे. जीवनात आनंद पाहिजे असेल तर मनात काहीच दडवून ठेवू नका. भगवान कृष्णाने भागवत ग्रंथामधून हेच सांगितले आहे. आरोग्याकडे दुर्लक्ष केले म्हणजे आध्यात्माकडे दुर्लक्ष केल्यासारखेच आहे. साधना सेवा आणि नाम या त्रिसुत्री मधूनच आपले जीवन सुंदर होणार आहे. आपल्या दिनक्रमामध्ये ध्यान, नाडीशुध्दी, सेवा आणि सहभाग आवश्यक आहे. असेही हभप चारूदत्त आफळे गुरूजी यांनी सांगितले.प्रारंभी डॉ. माधुरी दबडे यांनी प्रास्ताविक केले.

भागवत कथा समारोप करण्यापुर्वी गोपाळ काला करण्यात आला. त्यावेळी उपस्थिती महिला पुरूष भाविकांनी सभागृहातील मोकळ्या जागेत आणि स्टेजवर येवून चांगलाच ठेका धरून दांडिया,फुगडी खेळ खेळला. जवळपास १ तास हा खेळ सुरू होता. शेवटी भगवान श्रीकृष्णाच्या मुर्तीची डॉ. राजीव दबडे आणि डॉ. माधुरी दबडे तसेच यश दबडे यांच्या हस्ते पूजा करून या भागवत सप्ताहाचा समारोप करण्यात आला.

द. सोलापूर पंचायत समितीची ३ एप्रिलला आमसभा

✔ सुराज्य/सोलापूर

पंचायत समिती, दक्षिण सोलापूरची सन २०२२ - २३ ची वार्षिक आमसभा आमदार सुभाष देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सहअध्यक्षतेखाली सोमवार, दि. ३ एप्रिल रोजी होणार आहे. श्री छत्रपती शिवाजी रंगभवन येथे सकाळी ११ वाजता ही आमसभा होणार आहे, असे गटविकास अधिकारी बाळासाहेब वाय यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

शहर पोलीस शिपाई पदासाठी २ एप्रिल रोजी लेखी परीक्षा

✔ सुराज्य/सोलापूर

शहर पोलिस शिपाई पदासाठी २ एप्रिल २०२३ रोजी लेखी परीक्षा होणार आहे.यासाठी १११० उमेदवार पात्र आहेत.अक्कलकोट रस्त्यावरील एसव्हीसीएस हायस्कूल येथे सकाळी ८.३० ते १० या वेळेत ही परीक्षा होणार आहे. त्यासाठी उमेदवारांनी सकाळी ६ वाजता हजर राहावे.महाआयटी विभागाकडून ऑनलाइन प्रवेशपत्र प्राप्त घ्यावेत,तसेच आयुक्तालयाकडून भरती संदर्भात जे ओळखपत्र यापूर्वी दिले आहे.असे दोन्ही सोबत ठेवायचे आहे.या व्यतिरिक्त कुठलेही साहित्य सोबत बाळगू नका असे आवाहन पोलीस आयुक्तालय प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.यापूर्वी २६ मार्च रोजी चालक पदासाठी लेखी परीक्षा झाली.९६९ उमेदवार पात्र होते. त्यापैकी पन्नास जण गैरहजर होते.या लेखी परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर करण्यात आला आहे.

नातेपुते ग्रामीण रुग्णालयाच्या संरक्षण भिंतीच्या कामाचा शुभारंभ

✔ सुराज्य/नातेपुते

नातेपुते येथील गिरजापती श्री शंभू महादेवाचा लग्न सोहळ्याचे औचित्य साधून नातेपुते ग्रामीण रुग्णालयाच्या संरक्षण भिंतीचे कामाचे भूमिपूजन नातेपुते ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. नम्रता व्होरा, डॉ. किरण पोटे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शिवसेनेचे नातेपुते शहर उपप्रमुख पोपटराव शिंदे, फोंडशिरस प्रमुख संतोष गोरे, नातेपुते शहरगटनेते दादा मुलांनी, प्रभाग १६ चे प्रमुख राजू मुलांनी, भारतीय जनता पार्टीचे सतीश बरडकर, अथर्व राजकर, प्रभाग क्रमांक ११ चे प्रमुख सनी बरडकर, प्रभाग क्रमांक १३ चे प्रमुख सोनू लांडगे, नातेपुते शहर उपप्रमुख अक्षय सोरटे, भाजपचे नेते मनोज जाधव, तेजस गोरे ग्रामीण रुग्णालयाचे आजी मा शेख संतोष नडे व कर्मचारी उपस्थित होते.

शिवसेनेचे माळशिरस तालुका शिवसेनाप्रमुख राजकुमार हिवरकर-पाटील यांनी आरोग्यमंत्री तानाजी सावंत, सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली व पाठपुरावा करून नातेपुते ग्रामीण रुग्णालयासाठी संरक्षण भिंतीसाठी प्रस्ताव करून आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्याकडे मागणी केली असता त्या मागणीस तात्काळ मंजूरी मिळाली.

यावेळी बाळासाहेबांची शिवसेना तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील बोलत असताना म्हणाले की, नातेपुते व नातेपुते परिसरातील गोरगरीब जनतेला येथील ग्रामीण रुग्णालयात आरोग्य सेवा चांगली मिळावी.

कवी प्रवि राजे यांचे ब्रिजधाम आश्रमात काव्य सादरीकरण

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापुरातील रंगमंचाच्या दुनियेतील जागतिक विक्रम वीर कवी प्रवि उर्फ प्रशांत विजय राजे यांचा स्वरचित मराठी आणि हिंदी काव्य सादरीकरण तसेच हिंदी गीत आणि गझल असा बहारदार एकपात्री कार्यक्रम ब्रिजधाम येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात त्यांनी नेहमीच्याच आत्मविश्वासाने उच्च कोटीच्या कविता सादर करून अतिशय सुंदर रित्या किशोर कुमार,मुकेश यांची काही

गीते पण सादर केली,तसेच जगजीत सिंग यांच्या विषयी माहिती देत त्यांच्या गझलही सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

अव्याहतपणे २ तास प्रशांत विजय राजे यांचा हा कार्यक्रम सुरू होता आणि विशेष म्हणजे कोणत्याही प्रकारे मोबाईल, लॅपटॉप, डायरी असा आधार न घेता सादरीकरण आणि कविता गाणी गझल हे सुध्दा मुखोद्गत आणि भावनोक्तत सादरीकरणाने प्रेक्षक भारावून गेले होते.

त्यांच्या चीख मासूम कली की, तिरंगा यही मजहब हमारा, माझी माय , आखरी सपना, कुरबानी, अशा बहारदार कवितांनी आणि फुलो के रंग से, चांद आहे भरेगा अशा गीतांनी कार्यक्रमाची वेगळीच रंगत वाढत गेली. त्यांच्या गझल गायानानेपण सर्व मंत्रमुग्ध झाले होते .



एमआयटीतर्फे रामेश्वर(रुई) येथे प्रभू श्रीराम जन्मसोहळा

✔ सुराज्य/लातूर

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे व रामेश्वर (रूई) ग्रामस्थांच्या वतीने रामेश्वर (रुई), ता. जि. लातूर येथे चैत्र शुध्द ९, रामनवमी, गुरुवार, दि. ३० मार्च २०२३ रोजी सकाळी ठीक ८.१५ वाजता भारतीय संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, त्याग आणि समर्पणाचे मूर्तीमंत प्रतीक, तसेच, समस्त भारतीयांचे श्रध्दास्थान असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने सर्वधर्मसमभावाचे प्रतीक असलेले भारतीय संस्कृती दर्शन - श्रीराम' रथ यात्रा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय संस्कृती दर्शन - श्रीराम रथ यात्रा सोहळ्यास प्रथितयश लेखिका, कवी व विचारवंत डॉ. पुष्पिता अवस्थी, काशी बनारस येथील ज्येष्ठ तत्त्वज्ञ, विचारवंत डॉ. योगेंद्र मिश्रा, लातूरचे पोलिस अधिक्षक श्री. सोमय मुंडे हे सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी युनेस्को अध्यासन प्रमुख व अध्यक्ष विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेचे अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील.

गुरुवार, दि.३० मार्च २०२३ रोजी ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांचे काल्याचे कीर्तन असेल. पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का दादाराव कराड यांनी श्रीराम मंदिरास अर्पण केलेल्या सुंदर, रेखीव व वैशिष्ट्यपूर्ण अशा भारतीय संस्कृती दर्शन- श्रीराम रथाची, मानवतातीर्थ म्हणून साकार झालेल्या रामेश्वर गावची ग्रामप्रदक्षिणा सकाळी ८.१५ वा. निघेल. या रथ यात्रेनंतर सकाळी १० ते १२ वाजता ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांचे काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाचे वाटप केले जाईल. रामेश्वर (रुई), ता. जि. लातूर या गावी, हिंदू-मुस्लिम व इतर सर्व धर्मियांच्या परस्पर सहकार्यातून उभारण्यात आलेले अत्यंत सुंदर व देखणे श्री राम मंदिर, हजरत जैनुद्दीन चिस्ती दर्गा व जामा मस्जिद हे रामेश्वर (रुई) गावातील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे व राष्ट्रीय एकात्मतेचे' एक मूर्तिमंत प्रतीक आणि खर्या अर्थाने ज्ञानकेंद्र म्हणून उदयास येणार आहे, असा आम्हाला विश्वास वाटतो. सदरील श्रीराम रथ यात्रेचे मुस्लिम बांधवांकडूनही स्वागत केले जाणार आहे. श्री राम मंदिराबरोबरच, सोनावळा नदीचे तीरावरील दक्षिणेस असलेले श्री गोपाळबुवा महाराजांचे मंदिर, उत्तरेस असणारा हजरत जैनुद्दीन चिस्ती दर्गा व जामा मस्जिद, विश्वधर्मी श्रीराम-रहीम मानवता सेतू' व तथागत भगवान गौतम बुध्द विहार व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती विश्वशांती भवनाची भेट हाही एक चांगला अंतर्मुख करणारा अनुभव असेल. म्हणूनच रामेश्वर (रूई) हे गाव मानवतातीर्थ म्हणून ओळखले जात आहे. रामेश्वर (रुई) गावच्या पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या भारतीय संस्कृती दर्शन - श्रीराम रथ यात्रेमध्ये सहभागी व्हावे व श्रीराम रथ सोहळ्याची दैवी अनुभूती घ्यावी, असे आवाहन माईर्स एमआयटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड व माईर्स एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक व आमदार रमेशअप्पा कराड यांनी केले आहे.

श्रीनाथ विद्यालय बोरगाव येथे सेवानिवृत्तांचा सत्कार

श्रीपूर : बोरगाव (ता.माळशिरस) येथील श्रीनाथ विद्यालय व कै. विजयकुमार उर्फ बाबासाहेब शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय बोरगाव येथील उपशिक्षक नलवडे विकास रामचंद्र व प्रा. इनामदार अब्बास करीम यांचा सेवानिवृत्ती सत्कार समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कर्मवीर अण्णा व वहिनींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय तालबद्धपणे स्वतगीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य कांबळे के.टी. यांनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन माळशिरस तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन राजकुमार पाटील, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ.कुमुदिनी पाटील यांच्या हस्ते नलवडे विकास रामचंद्र व इनामदार अब्बास करीम यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना स्वत बँकेकडून दिले जाणारे चांदीचे नाणे प्रदान करण्यात आले. शिक्षक मनोगतामध्ये महारुद्र कोळी व मदने सर यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी स्थानिक स्कूल कमिटी सदस्य सुधीर कपडेकर, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष पृथ्वीराज पाटील, उप मुख्याध्यापक भुजबळ एम. एस., पर्यवेक्षक लष्कर आर.टी., दादासाहेब गाडे, बाळासाहेब मगर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ पाटील एस. एस यांनी केले तर आभार श्रीनिवास गज्जम यांनी मानले.

ह.भ.प चैतन्य महाराजांचे हनुमान जयंतीनिमित्त कीर्तन

श्रीपूर : श्रीपूर येथील शिवाजीनगर सेक्शन ९ येथे शिवछत्रपती तरुण मंडळ शिवाजीनगर व शिव धौर्य बहुउद्देशीय सामाजिक संस्था श्रीपुरचे अध्यक्ष मोहसीन पठाण व नाजीया मोहसीन पठाण नगरसेविकाव सभापती नियोजन व विकास नगरपंचायत महाळुंग श्रीपुर यांच्या वतीने हनुमान जयंतीनिमित्त महाराष्ट्रातील लाखो तरुणांचे प्रेरणास्थान युवा कीर्तनकार ह भ प चैतन्य महाराज वाडेकर यांचा कीर्तनाचा कार्यक्रम गुरुवार दिनांक ६ एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी ६.०० वाजता ठेवण्यात आला आहे. कीर्तनानंतर भाविकांना महाप्रसादाचे अयोजन केले आहे. या कीर्तनाच्या कार्यक्रमाला श्रीपुर महाळुंग परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान मोहसीन पठाण यांनी केले आहे.

रत्नाई कृषी महाविद्यालयास किकबॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक

अकलूज : अकलूजच्या शिक्षण प्रसारक मंडळाच्या रत्नाई कृषी महाविद्यालयातील चतुर्थ वर्षातील विद्यार्थी ऋषीकेश भागवत भाकरे यांनी महात्मा कृषी विद्यापीठाकडून किकबॉक्सींग स्पर्धेत खेळत ७५ किलो वजन गटात ६ फाईट खेळून सुवर्णपदक पटकावले. त्यानिमीत्त शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या स्पर्धा १३ ते १७ मार्च रोजी वीर बहादुरसिंह पूर्वांचल युनिव्हर्सिटी जौनपुर उत्तर प्रदेश येथे ऑल इंडिया युनिव्हर्सिटी किकबॉक्सिंग चॅम्पियन आयोजित करण्यात आल्या होत्या.या किकबॉक्सिंग चॅम्पियन स्पर्धेत ६५ विद्यापीठातील ६०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. रत्नाई कृषी महाविद्यालयातील खेळाडू ऋषीकेश भाकरे याने किकबॉक्सिंग चॅम्पियन राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्रथमच सुवर्णपदक संपादन केल्याबद्दल शिक्षण प्रसारक मंडळाचे मार्गदर्शन संचालक जयसिंह मोहिते-पाटील,कु,स्वरूपाराणी मोहिते -पाटील यांनी त्याचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. संग्रामसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते ऋषीकेश भाकरे याचा फेटा, शाल,हार,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले.यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य राजाभाऊ लव्हाळे,विनोद दोशी,तात्या एकतपुरे,नारायण फुले,सुभाष दळवी,वसंतराव जाधव,रामभाऊ गायकवाड,उत्कर्ष शेटे,सचिव अभिजीत रणवरे,सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील,प्रा.रवी नलवडे,प्रा.रणजीतसिंह निंबाळकर,प्रा.निलेश माने देशमुख,मार्गदर्शन क्रिडा शिक्षक प्रा.प्रदिप पांढरे,प्रा.दिनेश जाधव,प्रा.संतोष आडत उपस्थित होते.

२ एप्रिल रोजी सोलापुरात राज्यस्तरीय कवी संमेलन

सोलापूर : काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या वतीने सोलापूर जिल्हा परिषद जवळील हॉटेल समृध्द येथे २ एप्रिल रोजी सोलापूरात राज्यस्तरीय कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. काव्यप्रेमी शिक्षक मंचच्या ७ व्या वर्धापनदिनानिमित्त तसेच सुप्रसिध्द गझलकार कालिदास चवडेकर सरांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सदर कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून रविवार, दि.२ एप्रिल २३ रोजी सकाळी ठीक ११ वा. कवी संमेलनास सुरूवात होईल. संमेलनाचे उद्घाटन काव्यप्रेमीचे राज्याध्यक्ष आनंद घोडके यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पुणे येथील सुप्रसिध्द कवी गझलकार बबन धुमाळ हे भूषविणार आहेत. काव्यप्रेमीचे राज्य कोष्याध्यक्ष कृष्णा शिंदे, राज्य समिती सदस्य संदीप वाघोले व डॉ. सत्येंद्र राऊत याशिवाय मराठवाडा विभागीय अध्यक्ष विशाल अंधारे व उपाध्यक्ष अश्विनी धाट तसेच पुणे जिल्हा अध्यक्ष रणजित पवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अशी माहिती संयोजक नवनाथ खरात, लक्ष्मण काटेकर, महेश रायखेलकर व युवराज जगताप यांनी सांगितली आहे.

आई-वडिलांचे भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या मुलीस बेदम मारहाण

अकलूज : आई-वडिलांचे भांडणे सोडविण्यास गेलेल्यावर मुलीस वडिलांनी बेदम मारहाण केली.डोक्याला मार लागल्याने चक्कर येत असल्याने तिला उपचाराकरिता शासकीय रुग्णात दाखल केले.तेजस्वी शंभूराजे बंदपट्टे (वय-२० रा.चिंचोली एमआयडीसी सोलापूर) ही मुलगी काल दुपारी आई-वडिलांचे भांडण सोडविण्यास गेली असता,वडिलांनी तिला जबर मारहाण केली.उपचाराकरीता तिला शासकीय रुग्णात दाखल केले आहे.घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकी झाली आहे.

चैत्री यात्रा कालावधीत अन्न औषध प्रशासनाने खाद्यपदार्थ तपासणी मोहीम राबवावी : प्रांताधिकारी

सुराज्य/पंढरपूर

चैत्र शुध्द एकादशी ०२ एप्रिल २०२३ ला असून, यात्रेनिमित्त पंढरपूर शहरात श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. चैत्री यात्रा उन्हाळ्याच्या दिवसात असल्याने अन्न पदार्थ लवकर खराब होण्याची शक्यता आहे. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अन्न व औषध प्रशासनाने हॉटेल, उपवासाचे पदार्थ विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करण्यासाठी पथके नेमून मोहीम राबवावी अशा सूचना प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी दिल्या.

चैत्री यात्रा नियोजनाबाबत शासकीय विश्रागृह, पंढरपूर येथे बैठक घेण्यात आली. बैठकीस तहसीलदार सुशील बेल्हेकर, अप्पर तहसीलदार समाधान घुटुकडे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, पोलीस निरीक्षक अरुण फुगे, मिलिंद पाटील, मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ. प्रसन्न भातलवंडे,अन्न औषध प्रशासनचे श्री. कुचेकर, एस टी महामंडळाचे श्री .सुतार, न.पाचे नेताजी पवार, स्वच्छता विभागाचे शरद वायमारे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी प्रांताधिकारी गुरव म्हणाले, पंढरपुरात चैत्री यात्रा कालावधीत तीन ते चार लाख भाविक येतात. या यात्रेत भाविकांच्या आरोग्य सुरक्षेला व स्वच्छतेला प्राधान्य द्यावे. यात्रा कालावधीत पंढरपूर तसेच शहरालगत असणाऱ्या विविध मठामध्ये मोठ्या प्रमाणात भाविक वास्तव्यास असतात. अन्न औषध प्रशासनाने सर्व मठामध्ये बनविण्यात येणाऱ्या अन्न पदार्थाची तपासणी करावी व अन्न शिजवतना कोणती काळजी घ्यावी याबाबत आवश्यक सूचना द्याव्यात.तसेच दुकानातील भगर व इतर उपवासाच्या पदार्थांची तपासणी करावी. यात्रा कालावधीत नगरपालिकेने स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा मुबलक पाणी पुरवठा करावा. मोकाट जनावरांचा बंदोबस्त करावा. आरोग्य विभागाने तज्ञ डॉक्टरांसह वैद्यकीय पथकाची नेमणूक करावी. तसेच फिरते वैद्यकीय पथक, ऑक्सिजन, रक्तपुरवठा तसेच मुबलक औषधसाठा उपलब्ध राहील याबाबत नियोजन करावे. चैत्री यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीमध्ये कावडी स्नानासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. भाविकांच्या सुरक्षेसाठी नदीपात्रात यात्रिक बोटी सज्ज ठेवाव्यात. यात्रा कालावधीत दर्शन रांगेतील नियोजनाबाबत आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नेमावा.तसेच आवश्यक ठिकाणी सूचना फलक लावावेत. महावितरण विभागाने अखंडीत व सुरक्षित वीज पुरवठा करावा अशा सूचनाही श्री.गुरव यांनी यावेळी दिल्या. यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे यासाठी बोअरवेल, हातपंपाची पाणी तपासणी करण्यात येत आहे. जादा हंगामी स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. ६५ एकरमध्ये भाविकांच्या सुविधेसाठी पाणी, वीज, स्वच्छता आदी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या असल्याचे मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी सांगितले. तसेच मठामध्ये शिल्लक राहिलेले अन्न बाहेर न टाकता घंटा गाडीतच टाकावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. चैत्री यात्रा कालावधीत पत्राशेड, दर्शन रांग, दर्शन मंडप, मंदीर मंदीर परिसर येथील स्वचछता मंदीर समितीच्या वतीने करण्यात आहे. यासाठी ४०० स्वयंसेवक व मंदीर समितीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांची नेमणेक करण्यात आली आहे. दर्शनरांगेतील भाविकांना दशमी, एकादशी व द्वादशी दिवशी खिचडी, लिंबू सरबत, ताक किंवा मठ्ठा मोफत वाटप करण्यात येणार आहे. भाविकांसाठी पुरेसा प्रमाणात बुंदी व राजगिरा लाडूप्रसाद व्यवस्था करण्यात आली असल्याचे मंदीर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांनी सांगितले. चैत्री यात्रा कालावधीत प्रदक्षिणा मार्ग व मंदीर परिसरात फिरते विक्रेते, हाथगाडी वाले यांचा भाविकांना त्रास होऊ नये यासाठी ४ पोलीस अधिकारी ३५ पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. तसेच प्रदक्षिणा मार्गावर वाहनांना बंदी असून वाहन धारकांनी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनाचे पालन करावे. असे आवाहन पोलीस निरिक्षक अरुण फुगे यांनी केले.

मांजरीतील नेत्र तपासणी शिबिरात १२७ नागरिकांनी केली तपासणी

सुराज्य/सांगोला

कार्यतपस्वी आ.काकासाहेब साळुंखे-पाटील यांच्या पुण्यस्मृतिदिनानिमित्त सांगोला तालुक्यात मांजरी येथे आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराचा शुभारंभ मंगळवारी झाला. यामध्ये २१७ जणांनी सहभाग नोदंवला. या शिबिरासाठी डॉ.पियूष साळुंखे पाटील, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तानाजीकाका पाटील, युवक तालुकाध्यक्ष अनिलनाना खटकाळे, माजी नगराध्यक्ष अनिल खडतरे, शिरभावी गावचे माजी सरपंच अभिजीत नलवडे, माजी उपसभापती नारायणराव जगताप, डॉ. वैभव जांगळे, डॉ. किरण जगताप, मांजरी ग्रामपंचायत सरपंच सौ. मंगल मधुकर भुसे, उपसरपंच कौशल्या कांबळे, संगेवाडी गावचे सरपंच दामोदर वायमारे, चेअरमन दीपक शिंदे, वाढेगाव चे माजी सरपंच नंदकुमार दिये , मा. उपसरपंच अनिल दिये, सरपंच सचिन शिनगारे, शिनगारे, अमृतदादा उबाळे, भाऊसाहेब जगताप, दादासो शिनगारे, रंगनाथ पाटोळे, यांचे सह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

गावकऱ्यांनी साजरा केला 'डीपी'चा वाढदिवस

सुराज्य/चिखली

प्रत्येकजण आपल्या प्रियजणांचे वाढदिवस करतो. तर कुणी आवडत्या प्राण्यांचा, झाडाचा. पण तुम्ही कधी रोहित्राचा ज्याला आपण डीपी' म्हणतो आणि ज्यातून आपल्या घरात वीज येते त्याचा वाढदिवस कधी साजरा केलाय ?? नसणारच. पण अहो आमच्या मोहोळ तालुक्यातल्या चिखली गावात दरवर्षी डीपी'चा वाढदिवस करतात. बसला ना शॉक ९९९९

इथल्या गावकऱ्यांच म्हणनं आहे की, गेल्या २३ वर्षांपासून त्यांचा डीपी त्यांना विनाखंडित वीज देतो. ज्या विजेवर गावातल्या घरांना प्रकाश मिळतो. त्यांची मुलबाळं त्या प्रकाशात शिकतात. त्यांच्या मते त्यांचा डीपी ऊर्जेचा स्त्रोत आहे, ज्यावर त्यांची प्रगती झाली आहे, होत आहे. त्या डिपीबद्दल त्यांच्या मनात कृतज्ञता आहेच. पण

नुसतं मनात ठेवतील ते चिखलीकर कसले. गेल्या २३ वर्षांपासून ते त्यांच्या डिपीचा वाढदिवस साजरा करताहेत. त्याला हार घालतात. केक कापतात. वीज ग्राहकांचे प्रेम पाहून महावितरण तरी कसे मागे राहिल ? त्यांनीही यंदा या गावठाण डीपीला चांगलंच सजवलंय.

> या वाढदिवसामागे या गावचे जागरुक नागरिक व स्थानिक पत्रकार हनुमंत चौधरी यांची कल्पकता आहे. या डीपीवरील देखभालीसाठी चौधरी नेहमीच आग्रही असतात. तसेच गावच्या नागरिकांना वेळेवर वीजबिल भरण्यासही ते आवर्जून सांगतात. आज जिथे दोन रुपये वाचविण्यासाठी कोणी वीज चोरुन वापरतात, डीपी फोडून त्यातील तांब्याची तार चोरतात. तिथे खिशातील चार पैसे खर्चून विजेची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी काहीजण मागेपुढे पाहत नाहीत, हे विशेष !
>
> **– विकास पुरी,**
> जनसंपर्क अधिकारी महावितरण बारामती परिमंडळ

कुर्डूतील १७ वर्षीय मुलाला पळवून नेले

कुर्डूवाडी : शेतातील पाण्याची मोटार चालू करण्यासाठी गेलेला १७ वर्षीय सोहम शिवाजी पायगण यास कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणाने पळवून नेले.

ही घटना दि. २७ रोजी ८ च्या सुमारास घडली. याबाबत शिवाजी नामदेव पायगण (रा. कुर्डू ता.माढा) यांनी कुर्डुवाडी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की सोहम शिवाजी पायगण वय १७ हा दि.२७ मार्च रोजी सकाळी ८ वा. शेतातील पाण्याची मोटार चालू करण्यासाठी जो गेला तो परत घरी पोहचलाच नाही. याबाबत फिर्यादी व त्याचे नातेवाईक यांनी सोहम याचा शेतात, गावात, नातेवाईकांकडे, मित्रांकडे सर्वत्र शोध घेतला पण तो मिळून आला नाही. त्यामुळे कोणीतरी अज्ञात इसमाने सोहम यास अज्ञात कारणावरून फूस लावून पळवून नेल्याबाबत शिवाजी पायगण यांच्या फिर्यादीवरुन कुर्डुवाडी पोलिसांत इसमावर गुन्हा दाखल झाला आहे.

रद्द झालेले रेशनकार्ड ऑनलाईन करण्यासाठी दिरंगाई

पिलीव : माळशिरस तालुक्यात दिपावलीच्या वेळेस म्हणजेच ऑक्टोबर महीन्यात आनलाईन केलीली नावे मोठ्या प्रमाणात अचानक रद्द झाली. ही संख्या २० हजाराच्या आसपास असल्याचे समजते.

यामध्ये तालुक्यातील प्रत्येक गावातील रेशनकार्ड धारकांची नावे अचानक गायब झाली यामुळे अनेक रेशन कार्ड धारकामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले.त्यानंतर ज्यांची नावे रद्द झाली आहेत ती परत आनलाईन करणयासाठी संबंधित रेशन दुकानदारांनी कागदपत्रे पुरवठा विभागाकडे दिली आहेत. पण पुरवठा विभागातील संबंधित नेमलेल्या व्यक्तीने अनेक लोकांची

नावे आनलाईन केलीच नाहीत. नागरिकांनी त्याच्याकडे याबाबत विचारणा केली असता होतील की त्याला ४५ दिवस लागतात अश्या प्रकारची उत्तरे संबंधित व्यक्ती कडुन दिली जात आहेत. गेले पाच ते सहा महीन्यापासुन पुरवठा विभागातील त्या व्यक्तींची कार्डधारकांना चक्क टोलवाटोलवी सुरु आहे. मात्र तो व्यक्ती पैसे देणाऱ्या व्यक्तींची नावे लगेच आनलाईन करीत असल्याचे नागरिकांमधुन सांगीतले जात आहे. जो व्यक्ती जास्त पैसे देईल त्याची नावे संबंधित व्यक्ती लगेच करीत असल्याचे विदारक चित्र सध्या पुरवठा विभागात सुरु आहे. याविषयी माळशिरसचे प्रभारी तहसीलदार तुषार देशमुख यांना विचारले असता मी याविषयी पुरवठा अधिकारी केमकर यांना बोलतो व ती नावे ताबडतोब आनलाईन करणयास सांगतो असे सांगितले.

पिलीव परिसरात उसाचे क्षेत्र घटले

पाऊस नसल्यामुळे लागवडच नाही

पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरात गतवर्षी म्हणावा असा पाऊस झालाच नाही. त्यामुळे यंदा पिलीव परीसरात सध्या ऊसाची नवीन लागवड अतिशय कमी झाली आहे.

गेलया दोन वर्षात चांगला पाऊस झाला होता. त्यावेळेस वर्षभर ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणात सुरु होती पण यंदाच्या पावसाळयात पाऊस न झाल्यामुळे पाणी नसल्याने ऊसाची लागवड अगदी कमी प्रमाणात झाली आहे. तर शेतकऱ्यांनी ऊस गेल्यानंतर मोठ्या प्रमाणात मकेचे पिक येतले आहे. मका पिक नियाल्यावर कोणतेही पिक न करता शेतकरी पाऊस पडल्यानंतर जूलै किंवा ऑगस्ट महीन्यात पाऊस चांगला झाल्यावरच ऊसाची लागवड करणार हे निश्चित आहे. यामुळे यंदाचा गळीत हंगाम एकदम थोडाच असेल कारण उसाच्या क्षेत्रात कमालीची घट झाल्याचे चित्र सध्या पाहवयास मिळत आहे. कारखानदारांना गळीत हंगाम चालविणयासाठी कसरत करावी लागणार आहे.

वसंतराव काळे साखर कारखान्याच्या प्रारूप मतदार याद्या जाहीर

पंढरपूर : तालुक्यातील भाळवणी येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीची प्रक्रिया आता सुरू झाली असून बुधवारी कारखान्याची प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली आहे यात दहा हजार ८८२ मतदार आहेत तर या निवडणुकीसाठी संस्था मतदारसंघात सात संस्था मतदार आहेत.

कारखान्याची प्रारूप मतदार यादी बुधवार २९ मार्च रोजी सोलापूर येथील प्रादेशिक सहसंचालक साखर यांच्या कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या मतदार यादीमध्ये कारखान्याचे अध्यक्ष कल्याणराव काळे यांचे विरोधक असणारे एडवोकेट दीपक पवार यांचे नाव वगळण्यात आले आहे. कारखान्याने पवार यांचे सभासत्व सभासदत्व मागील वर्षी विशेष सर्वसाधारण सभेत रद्द केले होते. यास प्रादेशिक सहसंचालकांनीही मान्यता दिली होती. यावर पवार यांनी सहकार मंत्र्यांकडे अपील केले होते. राज्यात शिंदे- फडणवीस सरकार आल्यानंतर सहकारमंत्र्यांनी दीपक पवार यांचे सभासद व सभासदत्व रद्द करण्याच्या रद्द करण्याचा आदेश स्थगित केला होता. यामुळे पवार यांचे नाव मतदारयादीत येणे अपेक्षित होते. मात्र कारखान्याने प्रारूप यादीत पवार यांचे नाव समाविष्ट केलेले नाही. दरम्यान याबाबत आपण याविरोधात आक्षेप नोंदवणार असल्याचे दीपक पवार यांनी सांगितले. सहकार शिरोमणी कारखान्याची निवडणूक प्रक्रिया आता सुरू झाली असून सभासदांना दावे व आक्षेप दाखल करण्याकरता १० एप्रिल पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. ११ ते २० एप्रिल या कालावधीत दावे व आक्षेप अर्जावर सुनावणी होऊन निर्णय दिला जाणार आहे. तर अंतिम यादी २५ एप्रिल रोजी प्रसिद्ध केले जाणार आहे. सहकार शिरोमणी कारखान्याची कारखान्याची पंचवार्षिक निवडणुकीची मुदत आठ जून २०२१ रोजी संपली असून कोरोना व अतिवृष्टीमुळे निवडणूक पुढे ढकलण्यात आली होती. आता जून २०२३ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण केली जात आहे. या निवडणुकीत यंदा कल्याणराव काळे यांच्यासमोर विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील व कारखान्याचे माजी संचालक दीपक पवार हे आव्हान देण्याच्या तयारीत आहेत. या कारखान्यावर स्थापनेपासून काळे गटाचे वर्चस्व आहे.

श्री अर्धनारी नटेश्वराचा विवाह सोहळा उत्साहात

पूजेचे मानकरी जीवन उत्तमराव जानकर व डॉ.स्नेहल जानकर यांच्या हस्ते अर्धनारी नटेश्वराची पूजा

सुराज्य/वेळापूर

वेळापूर नगरीचे आराध्य दैवत श्री अर्धनारी नटेश्वराचा विवाह सोहळा हजारो भाविकांच्या साक्षीने मंगळवारी भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. अर्धनारी नटेश्वराच्या यात्रा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उत्तमराव जानकर यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रा कमिटीच्या वतीने सोहळ्याची तयारी करण्यात आली होती. मंदिर परिसरात लाईटच्या माळा टाकून सुंदर अशी विद्युत रोषणाई करण्यात आले होती. त्याचबरोबर विवाह सोहळ्या निमित्त मंदिराच्या गाभाऱ्यात आणि बाहेर फुलांची सुंदर अशी सजावट साधू पिसे यांनी केली होती.

अर्धनारी नटेश्वराच्या मंदिरा समोर दोन ठिकाणी आकर्षक अशी रांगोळी काढण्यात आली होती. वेळापूर ग्रामपंचायतिच्यावतीने विवाह सोहळ्यासाठी येणाऱ्या मानाच्या कवड्यांना अडथळा येणाऱ्या झाडांच्या फांद्या काढल्या होत्या त्याचबरोबर पालख्यांना अडथळा ठेवणाऱ्या विद्युत तारा व्यवस्थित महावितरण ने केल्या होत्या

रात्री ९.०० च्या सुमारास यात्रा सोहळा पूजेचे मानकरी जीवन उत्तमराव जानकर व डॉक्टर सौ.स्नेहल जीवन जानकर ,वेळापूर माजी सरपंच सौ विमलताई जानकर यांच्या समवेत त्यांच्या वतीने अर्धनारी नटेश्वर देण्यात येणारा मानाचा पोशाख देशपांडे वाड्यातून वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजीकाका चव्हाण, यात्राकमिटीचे अध्यक्ष मिलिंद सरतापे, कार्याध्यक्ष विनायक माने, खजिनदार जावेद मुलाणी, उपाध्यक्ष धनंजय शिवपुजे, यात्रा कमिटीचे सदस्य हणमंत वायदंडे, काशिनाथ आडत, निवृत्ती भुसारे, शिवाजी सावंत, सुखदेव आडत, शिवाजी मंडले, राहुल सराटे, शंकर आडत, उत्तम क्षीरसागर, शिवप्रसाद देशपांडे, विश्वास वाघे, अनंत जवंजाळ, श्रीशैल गाढवे, देशपांडे, गाढवे, जंवजाळ परिवारातील सदस्य या सर्वांच्या उपस्थितीत जीवन जानकर यांचा मानाचा आहेर गाढवे बंधू यांनी वाजत गाजत अर्धनारी नटेश्वराच्या मंदिरात आणला. त्याचबरोबर विवाह सोहळ्यासाठी देवाला बाशिंग देण्याचा मान कै. सूर्यकांत माने देशमुख यांच्या घराण्याला आहे मेटकरी यांनी त्यांच्याकडून बाशिंग आणून मंदिरात दिले, पायातील चप्पल जोडीचे मानकरी रायचंद खाडे यांनी चप्पल जोड मंदिरात आणून दिले. त्याचबरोबर मणी मंगळसूत्र, जोडवी, पैंजण, अंगठी, सूप, टोपली, केरसुनी इत्यादी वस्तूचे मानकरी यांनी आप आपल्या वस्तु मंदिरात आणून दिल्या. यानंतर १०.३० च्या दरम्यान मानाच्या कावडी मंदिरात येण्यास सुरुवात झाली. कावड यात्रा कमिटीचे सर्व सदस्य कावडीचे सर्व प्रमुख हे बळीची कावड अर्धनारी नटेश्वराच्या दारात घेऊन येतात. यानंतर अर्धनारी नटेश्वराच्या विवाह सोहळ्याच्या विधिवत पूजेला सुरुवात झाली. विवाह सोहळ्याच्या कार्यक्रमाला वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजीकाका चव्हाण, यात्रा कमिटीचे अध्यक्ष मिलिंद सरतापे, कार्याध्यक्ष विनायक माने, खजिनदार जावेद मुलाणी, उपाध्यक्ष धनंजय शिवपूजे, अश्विनी भानवसे हनुमंत वायदंडे, नानासो मुंगुस्कर ,सीमा खाडे, प्रियंका आडत, दत्ता जानकर, संदीप माने देशमुख, लखन मंडले, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष युवराज मंडले, रायचंद खाडे, पोपट जानकर, विश्वास वाघे, अमोल पनासे, महादेव म्हेत्रे, चंद्रकांत पोळ, नागेश क्षीरसागर ,जवान माने देशमुख, कच्चू मुलाणी, उत्तम क्षीरसागर, उमेश भानवसे, गणेश साठे, शिवप्रसाद देशपांडे, जीवन वाघे, रघुनाथ गोलारे, डॉ. धनंजय म्हेत्रे, मोहन पालकर यांच्यासह हजारोंच्या संख्येने भाविक विवाह सोहळ्यास उपस्थित होते.

द्राक्ष व्यापाऱ्याला मारहाण करून १ कोटीची लूट करणारी टोळी २४ तासांत गजाआड

सुराज्य/सांगली

द्राक्ष व्यापाऱ्याला मारहाण करून एक कोटीहून अधिक रक्कम लुटणाऱ्या टोळीला गुन्हा घडल्यानंतर २४ तासांत सांगलीच्या गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने गजाआड केले. लुटीतील रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेली दुचाकी पोलिसांनी हस्तगत केल्याची माहिती अधीक्षक बसवराज तेली यांनी बुधवारी सायंकाळी दिली.

याबाबत माहिती अशी की, द्राक्ष व्यापारी महेश शितलदास केवलाणी (वय ४९ रा. पिंपळगाव, ता. निफाड जि. नाशिक) हे शेतकऱ्यांना द्राक्ष खरेदीचे पैसे देण्यासाठी जात असताना तासगावमधील दत्तमाळ येथे असलेल्या गणेश कॉलनीमध्ये मोटार अडवून लुटण्याचा प्रकार मंगळवारी सायंकाळी साडेसात वाजता घडला होता. या प्रकरणी नितीन खंडू यलमार (वय २२), विकास मारुती पाटील (वय ३२) आणि अजित राजेंद्र पाटील (वय २२ सर्व रा. मतकुणकी, ता.तासगाव) या तिघांना अटक करण्यात आली.

काल रात्री द्राक्ष व्यापारी केवलाणी हे स्कॉर्पिओ (एमएच १५, ०२१५) मधून दिवाणजी राजेंद्र माळी व चालक आकाश चव्हाण यांच्यासोबत एक कोटी १० लाखाची रोकड घेऊन सांगलीहून तासगावमध्ये तात्पुरता निवास असलेल्या गणेश कॉलनीमध्ये निघाले होते. यावेळी वीज पुरवठा बंद असल्याने अंधाराचा फायदा घेऊन दुचाकीवरून आलेल्या दोघांनी चालकाच्या बाजूकडील काचेवर हात मारून काच खाली करण्यास भाग पाडले. काच खाली केल्यानंतर तलवारीने धाक दाखवत मागील बाजूस बसलेल्या व्यापाऱ्यांच्या हातातील रोकड असलेली पिशवी घेऊन त्यांनी पोबारा करण्याचा प्रयत्न केला. यावेळी व्यापारी व दिवाणजीने अटकाव केला असता त्यांना मारहाण करून ते पसार झाले होते.

या प्रकरणी तासगाव पोलीस ठाण्यात तात्काळ माहिती देण्यात आल्यानंतर पोलिसांची पथके रवाना करण्यात आली. स्थानिक शाखेचे कर्मचारी सागर टिंगरे यांना संशयित लुटलेल्या रोकडसह मणेराजुरीच्या शिकोबा डोंगराच्या पायथ्याला असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे निरीक्षक सतीश शिंदे व भानुदास निंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक संदीप शिंदे, प्रशांत निशाणदार, संदीप गुरव, सागर लवटे, मच्छिंद्र बर्डे, अनिल कोळेकर, संदीप पाटील, प्रशांत माळी, अमोल ऐदळे, प्रकाश पाटील आदी कर्मचाऱ्यांनी छापा टाकून तिघांना ताब्यात घेतले. गुन्ह्यात वापरण्यात आलेली दुचाकी ही वाळवा तालुक्यातील मच्छिंद्रगड येथून चोरलेली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

खा.गिरीष बापट यांना नेत्यांनी वाहिली श्रद्धांजली

पुणे : खासदार गिरीश बापट यांचं आज दीर्घ आजारने निधन झालं आहे. ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करुन खासदार गिरीश बापट यांना श्रद्धांजली वाहिली आहे. गिरीश बापट हे एक नम्र आणि कष्टाळू नेते होते , अशा शब्दांत त्यांनी शोक व्यक्त केला आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने आणि पुण्याने भाजपचा मातब्बर नेता गमावला आहे. त्यामुळे सर्व स्तरावरुन श्रद्धांजली वाहिली जात आहे.

गिरीश बापट एक नम्र आणि कष्टाळू नेते : नरेंद्र मोदी

नरेंद्र मोदी यांनी ट्विट करत त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. त्यासोबत त्यांनी गिरीश बापट यांच्यासोबतच विमानतळावरील फोटोदेखील शेअर केला आहे. गिरीश बापट हे एक नम्र आणि कष्टाळू नेते होते. गिरीश बापट यांनी समाजाची तळमळीने सेवा केली. त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर काम केले आणि विशेषत: पुण्याच्या विकासासाठी ते उत्कट होते. त्यांचे निधन दु:खद आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या आणि समर्थकांच्या संवेदना. ओम शांती, अशा शब्दांत नरेंद्र मोदी यांनी भावना व्यक्त केल्या आहेत.

एक सर्व समावेशक नेतृत्व हरपले आहे : मुख्यमंत्री

भारतीय जनता पक्षाचे पुण्यातील खासदार आणि ज्येष्ठ नेते गिरीश बापट यांच्या निधनामुळे राजकारणातील एक सर्व समावेशक नेतृत्व हरपले आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शोक व्यक्त केला आहे. दुर्धर आजाराशी झुंजत असताना देखील गिरीश बापट हे आपल्या पक्षाला ऊर्जा देण्याचे काम करत होते. त्यांच्याशी भेट व्हायची तेव्हा राजकारणातलेच नव्हे तर अनेक विषयांवर त्यांना असलेली माहिती पाहून चकित व्हायचो. नुकतीच पुण्यात त्यांची विचारपूस करण्यासाठी भेटही झाली होती. त्यांनी त्यांची राजकीय कारकीर्द अगदी नगरसेवकापासून सुरू केली होती. आमदार खासदार आणि राज्य मंत्रिमंडळात मंत्री म्हणून त्यांनी सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कायम पुढाकार घेतला. पालकमंत्री म्हणून पुण्याच्या विकासाच्या दृष्टीने त्यांनी पाऊले उचलली होती. सर्व पक्षांमध्ये त्यांची मैत्री होती. त्यांच्या उत्तम जनसंपर्काचे उदाहरण नेहमी दिले जायचे. महापालिकेत तर पक्षाची सत्ता नसतानाही ते स्थायी समितीचे अध्यक्ष झाले होते. असा मनमिळावू आणि दिलदार नेता आज आपल्यातून गेला असेही मुख्यमंत्र्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

अत्यंत हजरजवाबी नेता भाजपने गमावला : देवेंद्र फडणवीस

गिरीश बापट यांचं निधन आमच्यासाठी धक्कादायक आहे. मागील काही दिवस ते दुर्धर आजाराशी झुंज देत होते. मात्र या आजारावर ते मार करतील अशी आशा होती. मात्र त्यांची आजाराशी सुरु असलेली झुंज अपयशी ठरली. जनसामान्यांशी जुळलेला आणि जनीमीवरची माहिती असलेला नेता अशी त्यांची ओळख होती. शेतीतदेखील त्यांना रस होता. अमरावतीत जाऊन ते कधीतरी शेतात रमायचे. अत्यंत हजरजवाबी नेता भाजपने गमावला, अशा शब्दात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.

मैत्री जपावी तर गिरीश बापटांसारखी; राष्ट्रवादीच्या नेत्यांनाही अश्रू अनावर

सर्वसमावेशक अशी ओळख असलेले खासदार गिरीश बापट यांचं दीर्घ आजाराने निधन झालं. भाजपचा किंगमेकर गेल्याने भाजपला मोठा धक्का बसला आहे. त्याचबरोबर विरोध पक्षातील नेत्यांनाही अश्रू अनावर झाले आहे. राष्ट्रवादीच्या नेत्यांनी त्यांना पाणावलेल्या डोळ्यांनी श्रद्धांजली वाहिली आहे. मैत्री जपावी तर गिरीश बापट यांच्यासारखी, अशा भावना राष्ट्रवादीच्या नेत्यांनी व्यक्त केल्या आहेत. त्यांच्या या एक्झिटमुळे राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे. सगळीकडून दु:ख व्यक्त केलं जात आहे. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवारांनी ट्विट करत गिरीश बापट यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

माझे लोकसभेतील सहकारी : सुप्रिया सुळे

राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीदेखील त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. माझे लोकसभेतील सहकारी आणि पुणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार गिरीश बापट यांचे निधन झाले. ही बातमी अतिशय दु:खद आहे. सलग पाच वेळा पुण्यातून ते आमदार म्हणून विधानसभेत निवडून गेले. त्यांना काही काळ राज्य मंत्रिमंडळातही काम करण्याची संधी लाभली होती. त्यांच्या निधनामुळे एक मनमिळाऊ स्वभावाचे नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले. भावपूर्ण श्रद्धांजली, अशा शब्दांत त्यांनी शोक व्यक्त केला आहे.

आम्ही ज्येष्ठ सहकारी, सुहृदय मित्र गमावला : अजित पवार

महाराष्ट्राचं सर्वसमावेशक, सुसंस्कृत राजकारणाचा चेहरा म्हणून गिरीशभाऊंकडे पाहिले जायचं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत तयार झालेल्या गिरीशभाऊंनी जात, धर्म, पंथ, प्रांत, भाषा, पक्षभेदांच्या भिंती ओलांडून समाजकार्य, विकासाचं राजकारण केलं. टेल्को कंपनीतल्या कामगार नेत्यापासून सुरु झालेला त्यांचा प्रवास पुणे महापालिकेचे नगरसेवक, स्थायी समिती अध्यक्ष, आमदार, मंत्री, खासदार पदापर्यंत पोहचला. चार दशकांच्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीत गिरीशभाऊंना पुणेकरांचं अलोट प्रेम मिळालं. १९९५ पासून २०१४ पर्यंत सलग पाच वेळा ते आमदार झाले. २०१९ ला खासदार झाले. राज्याचे मंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून पुणे शहर, जिल्ह्याच्या विकासातलं त्यांच योगदान कायम स्मरणात राहील. काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती ठिक नव्हती. आजाराशी ते निर्धारनं लढत होतं. बरे होऊन सार्वजनिक जीवनात ते पुन्हा सक्रीय होतील, हा विश्वास आम्हा सगळ्यांना होता. तो विश्वास खोटा ठरला. गिरीशभाऊंच्या निधनानं पुणे जिल्ह्याचं सर्वसमावेशक नेतृत्वं हरपलं आहे. आम्ही ज्येष्ठ सहकारी, सुहृदय मित्र गमावला आहे.

कायद्यानुसार मी कोट्यवधींची मालकीण : करूणा शर्मा

सुराज्य/मुंबई

करूणा शर्मा यांनी पुन्हा एकदा धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मी ब्लॅकमेलर आहे की धनंजय मुंडे याची कागदपत्रं मी देईन असं धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे. एवढंच नाही तर धनंजय मुंडे यांनी निवडणुकीच्या आधी जे प्रतिज्ञापत्र सादर केलं त्यात धनंजय मुंडे किती खरं बोललात, हरिश्चंद्राचा अवतार आहेत का हे यावरूनच समोर येतं असा टोला करूणा शर्मा यांनी लगावला. त्याच प्रमाणे हे प्रतिज्ञापत्र म्हणजे धनंजय मुंडे किती खोटारडे आहेत याचा एकप्रकारे पुरावाच आहे असंही करूणा शर्मा यांनी म्हटलं आहे.

धनंजय मुंडे यांचं प्रतिज्ञापत्र दाखवत करूणा शर्मा म्हणाल्या की धनंजय मुंडे यांनी या प्रतिज्ञापत्रात पत्नींची संख्या लपवली आहे. कायदेशीररित्या धनंजय मुंडे दोन बायकांचे पती आहेत. ती माहिती लपवली आहे. तसंच मुलांची संख्या लपवली आहे. त्यांच्या विरोधात ज्या केसेस आहेत त्याची संख्याही धनंजय मुंडे यांनी लपवली आहे असंही करूणा शर्मा यांनी म्हटलं आहे. तसंच मुलांची संख्याही लपवली आहे. एवढी सगळी लपवाछपवी केल्यानंतरही धनंजय मुंडे यांना ते निवडून कसे देतात? हेच मला समजत नाही असंही करूणा शर्मा म्हणाल्या.

मी आत्तापर्यंत गप्प होते पण आता गप्प राहणार नाही. माझ्याविरोधात त्यांनी कोर्टाचा आदेश आणला होता की मी माध्यमांना काहीही माहिती देऊ शकत नाही. पण आता मी शांत राहणार नाही. आज धनंजय मुंडे यांची याचिका दाखवते आहे. त्यात १९९८ पासून मी आणि करूणा सोबत आहोत असं लिहिलं आहे मात्र मी तुम्हाला सांगू इच्छिते की आम्ही १९९६ पासून सोबत राहतो आहोत. तसंच जे प्रतिज्ञापत्र धनंजय मुंडे यांनी सादर केलं आहे त्यात त्यांनी म्हटलं आहे की मी आणि करूणा जगातल्या काही देशांमध्ये गेलो आहे. धनंजय मुंडे आजपर्यंत जेव्हा जेव्हा देशाबाहेर गेले आहेत तेव्हा मीच त्यांच्यासोबत होते. कारण त्यांचं माझ्यावर तेवढं प्रेम त्यांचं होतं. मला धनंजय मुंडेंपासून दोन मुलं आहेत. माझ्या मुलांच्या आधार कार्डवर, पॅन कार्डवर वडील म्हणून धनंजय मुंडे यांचं नाव आहे. माझ्या आधार कार्डवर, पासपोर्टवरही धनंजय मुंडेंचं नाव आहे. या प्रतिज्ञापत्रात धनंजय मुंडे यांनी हे देखील लिहून दिलं आहे की मुलं माझी आहेत. हे सगळे पुरावे आज करूणा शर्मा यांनी सादर केले.

पत्रकार परिषदेत दाखवली कागदपत्रे

माझ्या नावावर एक कोटींची पॉलिसी आहे. यामध्ये नॉमिनी म्हणून माझे पती धनंजय मुंडे यांचं नाव आहे. मी ही पॉलिसी २०१६ मध्ये काढली आहे. याशिवाय माझा पासपोर्ट, माझं आधार कार्ड या सगळ्यावर करूणा धनंजय मुंडे आहे. माझ्या मुलांच्या जन्म दाखल्यांवरही धनंजय मुंडे यांचं नाव आहे. आज माझा मुलगा १९ वर्षांचा आहे. इतके दिवस कधीही धनंजय मुंडे यांना यामुळे कुठलीही समस्या आली नाही. पण त्यांनी जेव्हा नीचपणाचा कळस गाठला तेव्हा मी पण गप्प बसणार नाही हे मी ठरवलं असं सांगत करूणा शर्मा यांनी सगळी कागदपत्रं पत्रकार परिषदेत सादर केली.

युवा कीर्तनकार ह.भ.प.चैतन्य महाराज वाडेकर यांचे १ रोजी कीर्तन

सुराज्य/मंगळवेढा

स्व. महादेवराव बाबुराव आवताडे यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित्त सांप्रदायिक परंपरेतील युवा कीर्तनकार ह.भ.प. चैतन्य महाराज वाडेकर यांचे १ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ९ वाजता आमदार समाधान महादेव आवताडे जनसंपर्क कार्यालय खंडोबा गल्ली मंगळवेढा येथील प्रांगणामध्ये कै महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठान यांच्या वतीने किर्तनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रतिष्ठान आयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.नियोजित कीर्तन सेवेनंतर दुपारी १२.०० वाजता पुष्पवृष्टी, भजन सेवा व महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. तरी नियोजित कार्यक्रमासाठी सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन श्री संत दामाजी मंदिर समितीचे अध्यक्ष तथा त्यांचे बंधू विष्णुपंत बाबुराव आवताडे यांनी केले आहे.

'स्मार्ट पेन्शन प्लस' योजना सुरू

सुराज्य/सोलापूर

भारतातील अग्रगण्य जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या एचडीएफसी लाइफने स्मार्ट पेन्शन प्लस-ही योजना सुरू केली आहे,जी ग्राहकांना निवृत्तीनंतर उत्पन्नाच्या नियमित आणि हमी १ प्रवाहाच्या स्वरूपात आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करण्यास सक्षम करते. अनीश खन्ना म्हणाले,आमची नवीनतम ऑफर,एच डी एफ सी लाइफ स्मार्ट पेन्शन प्लस ही एक अनोखी वार्षिकी योजना आहे जी निवृत्तीनंतरच्या जीवनासाठी विशिष्ट आवश्यकता पूर्ण करण्यासाठी सानुकूलित केली जाऊ शकते.

राम मंदिरासाठी पाठवलेले गडचिरोलीतील लाकूड १००० वर्षांपर्यंत टिकणार



चंद्रपूर : रामनवमीच्या एक दिवस आधीच चंद्रपुरात जणू अयोध्या नगरी अवतरल्याचं दिसून आलं. चंद्रपूर ते बल्लारपूर या दोन शहरांमध्ये सगळं वातावरण राममय झालं होतं. निमित्त होतं काष्ठ पूजेचं. अयोध्येतील राममंदिराच्या गर्भगृहासाठी मोठ्या प्रमाणात सागवान लाकडाचा वापर होणार आहे आणि विशेष म्हणजे या साठी आपल्या राज्यातील आलापल्लीच्या जंगलातील सागवानाची निवड करण्यात आली आहे. राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अखत्यारीत येणाऱ्या वनविकास महामंडळाला हे सागवान पुरवण्यासाठी श्रीराममंदिर ट्रस्टने विनंती केली आणि त्याप्रमाणे आलापल्लीच्या जंगलातील अतिशय उत्कृष्ट सागवान राममंदिरासाठी निवडण्यात आलं. विशेष म्हणजे सुधीर मुनगंटीवार हे १९९२ च्या श्रीराम जन्मभूमी आंदोलनात कारसेवक म्हणून सामील झाले होते. त्यामुळे त्यांच्यासाठी हा कर्तव्यपूर्ती सोबतच अतिशय भावनिक विषय झाला.

गडचिरोलीतील सागवानाचे वैशिष्ट काय?

● या सागवान लाकडावर पाऊस, ऊन, वारा, कीड यांचा प्रभाव होत नाही. ● पाण्याच्या प्रादुर्भावामुळे ते फुगले तरी पुन्हा पूर्वस्थितीत येते. ● या सागवानात टेक्टॉनीन हा ऑइल कन्टेन्ट खूप जास्त आहे, त्यामुळे याला कीड लागत नाही आणि लाकडात खूप चमक असते. ● राममंदिरासाठी निवडण्यात आलेली सागाची झाडं किमान ८० वर्षांची आहेत. त्यामुळे लाकडात ग्रेन्सची संख्या जास्त आहे, यामुळे लाकडाला विशिष्ट प्रकारचा ब्राऊन रंग येतो आणि हे लाकूड नक्षीकाम केल्यावर खूप सुंदर दिसतं. ● हे सर्व लाकूड नॅचरल फॉरेस्टमधील असल्याने याला कीड लागत नाही आणि हे लाकूड खूप जीवट असतं.

कर्नाटकात भाजपला धक्का, काँग्रेस सत्ता स्थापन करणार

कर्नाटका : कर्नाटकात सत्ताधारी भाजपला धक्का बसणार असून काँग्रेस सर्वाधिक जागा जिंकत सत्ता स्थापन करण्याची शक्यता आहे असं सी व्होटर सर्वेतून समोर आलं आहे. ओपिनियन पोलनुसार कर्नाटकात काँग्रेसला ११५-१२७ जागा मिळू शकतात. भाजपला ६८-८० तर जेडीएसला २३-३५ जागा मिळतील असा अंदाज आहे. निवडणूक आयोगाने बुधवारी कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. राज्यात १० मे रोजी एकाच टप्प्यात निवडणुका होणार असून १३ मे रोजी निकाल जाहीर होणार आहेत. या घोषणेमुळे या दक्षिणेकडील राज्यात सत्ताधारी भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि प्रमुख प्रतिस्पर्धी काँग्रेस यांच्यातील निवडणूक युद्धाचं बिगुल वाजलं आहे. धर्मनिरपेक्ष जनता दल हा राज्यातील तिसरा मोठा पक्ष आहे. नतेच्या मनात काय आहे हे जाणून घेण्यासाठी सी-व्होटरने एबीपी न्यूजसाठी ओपिनियन पोल घेतला आहे. या ओपिनियन पोलमध्ये २४ हजार ७५९ लोकांची मते घेण्यात आली आहेत.

पंजाबात अमृतपाल सिंगला घेरले?

सुराज्य/मुंबई

खलिस्तान समर्थक आणि वारिस पंजाब दे'चा प्रमुख अमृतपाल सिंग अद्यापही फरार आहे. पंजाब, दिल्ली, हरियाणाची पोलीस अमृतपाल सिंगचा शोध घेत आहेत. अशात महत्वाची घडामोड समोर आली आहे. अमृतपाल सिंग हा पंजाबमध्येच असल्याचं सांगण्यात येत आहे. अमृतपाल सुवर्ण मंदिरात अकाल तख्तवर जाऊन आत्मसमर्पण करू इच्छित असल्याचं सांगितलं जात आहे. त्या पार्श्वभूमीवर पंजाब पोलिसांनी सुवर्ण मंदिराच्या परिसरातील सुरक्षेत वाढ केली आहे.

अमृतपाल सिंग एका आंतरराष्ट्रीय माध्यमाला मुलाखत देण्यासाठी जालंधरला जात होता. पहिल्यांदा संपूर्ण प्रकरणाची माहिती द्यावी आणि नंतर पंजाब पोलिसांकडे आत्मसमपर्ण करावं, असा अमृतपाल सिंगचा प्लॅन होता. पण, याची माहिती पंजाब पोलिसांना आधीच मिळाल्याने अमृतपालचा प्लॅन फसला.

मंगळवारी अमृतपाल सिंग होशियारपूर येथे लपल्याची माहिती पंजाब पोलिसांना मिळाली होती. फगवाडा येथे एका अज्ञात कारमध्ये अमृतपाल सिंग असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी पाठलाग केला. पण, मरनिया येथील गुरूद्वाऱ्याजवळ कारमधील लोक गाडी सोडून फरार झाले. यानंतर मरनिया गाव आणि आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस तैनात करण्यात आले. तसेच, अमृतपालला पकडण्यासाठी पोलिसांनी मंगळवारी रात्री घर ते घर' तपासणी केली.

अमृतपाल सिंग हा वारिस पंजाब दे' संघटनेचा प्रमुख आहे. काही दिवसांपूर्वीच तो दुबईतून भारतात आला आहे. वारिस पंजाब दे' संघटनेची स्थापन पंजाबी अभिनेता दीप सिद्धू याने केली होती. दीप सिद्धू याच्या मृत्यूनंतर अमृतपाल सिंगने वारिस पंजाब दे' संघटनेवर कब्जा केला. अमृतपाल सिंगचे दहशतवादी संघटना आयएसआयशी संबंध असल्याचं सांगितलं जात आहे. आज तक'ने याबाबत वृत्त दिलं आहे.

सुवर्ण मंदिरात आत्मसमर्पण करण्याची शक्यता

३३ लाखांचा धान्य घोटाळा

सुराज्य/हिंगोली

हिंगोली जिल्ह्यात २०१९ साली जानेवारी ते जुलै या कालावधी दरम्यान झालेल्या स्वस्त धान्य घोटाळा प्रकरणी अखेर तत्कालीन तहसीलदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीन वर्षांपूर्वी हिंगोलीत झालेल्या स्वस्त धान्य घोटाळा प्रकरणी ३३ लाख रुपये वसुलीपात्र रक्कम न भरल्याने अखेर तत्कालीन तहसीलदार गजानन शिंदे आणि स्वस्त धान्य दुकानदार अशा एकूण वीस लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हिंगोली पोलिसात मंगळवारी रात्री उशिरा या प्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिविक्षाधीन तहसीलदार असलेल्या हिमालय घोरपडे यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तीन वर्षांपूर्वी म्हणजेच २०१९ मध्ये हिंगोली तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागात घोटाळा झाल्याचे समोर आले होते. जानेवारी ते जुलै २०१९ या कालावधीत ऑफलाईन धान्य वाटप करताना स्वस्त धान्य दुकानदारांना अतिरिक्ति धान्याचे वाटप केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. त्यामुळे या सर्व प्रकरणात चौकशी करून घोटाळ्यात सहभागी असलेल्या लोकांना पुरवठा विभागाने नोटीस देऊन अतिरिक्त वाटप झालेल्या धान्याची रक्कम भरण्याच्या सूचना दिल्या होत्या. दरम्यान नोटीस आल्यावर काही लोकांनी रक्कम भरणा देखील केली. परंतु यातील ३३ लाख रुपयांची वसुलपात्र रक्कम भरण्यात आली नाही. त्यामुळे नोटीस देऊनही वसुलपात्र रक्कम भरण्यात न आल्याने याप्रकरणी बुधवारी पहाटे हिंगोली शहर पोलिस ठाण्यात २० जणांविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तर पोलिसांकडून या प्रकरणात तपास करण्यात येत आहे.

तत्कालीन तहसीलदारांसह २० लोकांवर गुन्हा दाखल

यांच्यावर गुन्हा दाखल

या प्रकरणी हिंगोली तहसीलचे परिविक्षाधिन तहसीलदार हिमालय घोरपडे यांच्या फिर्यादीवरून तत्कालीन तहसीलदार गजानन शिंदे, तत्कालीन अव्वल कारकून कैलास वाघमारे, तत्कालीन गोदामपाल इम्रान पठाण, तत्कालीन अव्वल कारकून बी.बी. खडसे, रास्तभाव दुकानदार रेखा प्रकाश पाईकराव (माळसेलू), पी.आर. गरड (राहोली), ज्ञानेश्वर रामराव मस्के (सिरसम बु.), गोविंदा पुंजाजी मस्के (तिखाडी), गणाजी मुकिंदा बेले (खेर्डावाडी), विनोद लक्ष्मण आडे (पेडगाव१), हिंगोली तालुका विक्री संघ क्र. १चे चालक, रास्तभाव दुकानदार एस.के. चव्हाण (पळसोना), डी.एम. शिंदे (सावरगाव बं), मिलिंद निवृत्ती पडघन (जुमडा म.), डी.बी. चव्हाण (मौजा), गजानन नामदेव गडदे (गाडीबोरी), अनुसया अंबादास गाडे (वैजापूर), गोपाल तापडीया (भिरडा), डी.बी. चव्हाण (हिरडी), पतिंगराव मस्के (वराडी) यांच्यावर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

शहरातील पाणी प्रश्नी लोकप्रतिनिधी महापालिकेत

आ.विजयकुमार देशमुख, आ.शिंदेंची पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी

सुराज्य/सोलापूर

शहराच्या विस्कळीत पाणी पुरवठ्याच्या प्रश्नावर बुधवारी शहरातील लोकप्रतिनिधींनी महापालिका गाठत आयुक्तांना जाब विचारत पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. आ. विजयकुमार देशमुख, आ. प्रणिती शिंदे यांच्यासह चार माजी महिला महापौरांनी आयुक्तांची भेट घेतली. त्याचबरोबर माजी आ. दिलीप माने समर्थकही दुहेरी जलवाहिनीसंदर्भात पाणीपुरवठ्या अधिकाऱ्यांना भेटले.

माने समर्थकांचाही पाठपुरावा

दुहेरी जलवाहिनीसाठी माजी आमदार दिलीप माने यांच्या समर्थकांनाही पाठपुरावा सुरू केला आहे. शिवाजी घोडके, पाटील यांनी महापालिकेत येऊन पाण्यासंदर्भात आणि दुहेरी जलवाहिनीचे काम कुठपर्यंत आले आहे याची माहिती घेतली.



शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करा : आ.देशमुख

सोलापूर शहराचा पाणीपुरवठा गेल्या काही दिवसांपासून विस्कळीत होत आहे. सकाळच्या ठिकाणी संध्याकाळी तर संध्याकाळच्या ठिकाणी रात्री पाणी येत आहे. त्यामुळे नागरिकांना अनेक समस्या येत आहेत. लवकरात लवकर पाणीपुरवठा सुरळीत करावा अशा सूचना आमदार विजयकुमार देशमुख यांनी महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांना दिल्या. आयुक्तांनी गेल्या काही दिवसांपूर्वी असल्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता मात्र आता लवकरच सुरळीत होईल असे सांगितले. यावेळी आमदार विजयकुमार देशमुख यांनी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांचीही भेट घेऊन पाण्यासंदर्भात चर्चा केली. यावेळी माजी नगरसेवक शिवानंद पाटील उपस्थित होते.

पाणीपुरवठा दोन दिवसाआड करा, अन्यथा आंदोलनः आ.शिंदे

एक काळ होता उजनी मायनस मध्ये असताना सुद्धा आपण दोन दिवसात पाणी देत होतो. आताही शहराची लोकसंख्या तेवढीच आहे तरी पाणीपुरवठ्याला विस्कळीतपणा होत आहे. त्यामुळे लवकरात लवकर सोलापूर शहराचा पाणीपुरवठा दोन दिवसात करा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडू अशा इशारा आ.शिंदे यांनी महापालिका प्रशासनाला दिला. नगरसेवक असते तर दबाव टाकून पाणीपुरवठा सुरळीत केला असता. मात्र सध्या प्रशासक असल्यामुळे त्यांच्यावर कोणाचाही दबाव आलेला नाही. भाजप सरकार जाणीवपूर्वक निवडणूक घेत नाही त्यांना पराभवची भीती आहे. त्यामुळे लवकरात लवकर निवडणूक होणे आवश्यक आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी माजी नगरसेविका सुनिता रोटे, राष्ट्रवादी युवती शहराध्यक्ष प्रतीक्षा चव्हाण, लता ढेरे आदी काँग्रेस कार्यकर्ते उपस्थित होते.

पाणीपुरवठा सुरळीत करावा : बनशेट्टी

आमच्या काळात समांतर जलवाहिनीचे उद्घाटन झाले. मात्र ती अद्याप पूर्ण होऊ शकली नाही, याची खंत आहे. आम्ही सुरुवातीच्या काळात दोन ते तीन दिवसात पाणीपुरवठा केला मात्र आता पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. औज आणि उजनी येथे मुबलक पाणी साठा आहे. तरीही पाणीपुरवठा का सुरळीत होत नाही? याचा विचार करणे आवश्यक आहे, असे माजी महापौर बनशेट्टी म्हणाल्या.

मग स्मार्ट सिटीचा काय उपयोग : आबुटे

आपण महापौर असताना स्मार्ट सिटीची योजना आली. या स्मार्ट सिटीमुळे शहरात चांगली कामे होतील. त्यामुळे आम्ही त्याला मान्यता दिली. मात्र स्मार्ट सिटीची कामेही झाले नाहीत. या उलट सध्या पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. मग स्मार्ट सिटीचा काय उपयोग असा सवाल माजी महापौर सुशीला आबुटे यांनी उपस्थित केला.

....पाणीपुरवठा विस्कळीत : चंदेले

मी महापौर असताना दुष्काळ पडला होता. तसेच उजनीमध्ये पाणीसाठा शिल्लक नव्हता. तरीही आपण शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठा केला आणि सोलापूरकरांची तहान भागवली. मात्र आता उजनी धरणात मुबलक पाणीपुरवठा असतानाही केवळ नियोजन अभावी पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे. यात लवकरात लवकर सुधारणा करावी, अशी मागणी माजी महापौर नलिनी चंदेले यांनी केली.

आयुक्तांनी केली टाकळी, औज बंधाऱ्याची पाहणी

सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांनी बुधवारी महापालिकेच्या टाकळी पंप हाऊस तसेच औज बंधारा येथे पाहणी केली.सोलापूर शहरासाठी उजनी जलाशयातून भीमा नदीच्या पात्रातून वर्षाला एकूण ५ रोटेशन ने पाणी सोडले जाते. तसेच उजनी जलाशयातून भीमा नदी पात्रातून सोलापूर शहरासाठी औज बंधाऱ्यात पाणी सोडण्यात आले असून औज बंधाऱ्यातील पाण्याची पातळी तसेच औज बंधाऱ्यातील पाणी पुढे औज व चिंचपूर बंधाऱ्यात येते आणि पुढे शहराला टाकळी इंटेकवेल येथून उपसा करून पुढे शहरासाठी पाणीपुरवठा केले जाते.यावेळी आयुक्त शीतल तेली-उगले आदी ठिकाणाचे पाहाणी करून अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सहायक अभियंता नीलकंठ मठपती,सहायक अभियंता यलगुलवार आदी मान्यवर उपस्थित होते.

तिन्ही आमदारांनी एकत्र यावे : यन्नम

आम्ही सर्वजण पक्षभेद विसरून पाण्यासाठी एकत्र येण्यासाठी तयार आहोत. आयुक्त या महिला आहेत त्यांनी यासाठी पुढाकार घेऊन पाणीपुरवठा सुरळीत करावा. सध्या त्या स्मार्ट सिटीच्या सीईओ आहेत. यापूर्वी दोन अधिकाऱ्यांमुळे दुहेरी जलवाहिनीच्या कामात अनेक अडथळे आले मात्र आता सध्या त्या एकमेव अधिकारी असल्यामुळे लवकरात लवकर त्यांनी हा प्रश्न सोडवावा. शहरातील तिन्ही आमदारांनी पाण्यासाठी एकत्र यावे, असे आवाहन माजी महापौर श्रीकांचना यन्नम यांनी केले.

मिळकत कर थकबाकीपोटी १ कारखाना व ९ गाळे सील

दिवसभरात १ कोटी २८ लाख रुपये जमा

सोलापूर : महापालिकेच्या वसुली पथकाकडून मिळकत कराच्या थकबाकीपोटी बुधवारी ९ गाळे व १ कारखाना सील करण्यात आला आहे. तर महापालिका तिजोरीत दिवसभरात एक कोटी २८ लाख ४६ हजार ३८४ कर भरणा झाला आहे.

महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार मिळकत कर वसुली व जप्ती - सीलची धडक कारवाही अधिक तीव्र करण्यात आली आहे. उपायुक्त विद्या पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता कर विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांच्या नेतृत्वाखाली विविध पथकांच्या माध्यमातून ही मोहीम

सुरू आहे. बुधवारी पश्चिम मंगळवार पेठ येथील मिळकतदार नंदकुमार गंगाराम नगपाल यांच्याकडील दोन लाख ४९ हजार ९३० रुपये थकबाकीपोटी एक गाळ सील करण्यात आला आहे. जोडभावी पेठ येथील पांडुरंग मादास यांच्याकडील एक लाख ४५ हजार ८३१ रुपये थकबाकीपोटी ८ गाळे केले आहेत तर ५८ पेठ येथील प्रेम टेक्स्टाईल (पीआर ओपी नरसय्या पासनूर यांच्याकडील तीन लाख २६ हजार ९४१ रुपये थकबाकीपोटी कारखाना सील करण्यात आला आहे.

पश्चिम मंगळवार पेठ, ६४ पेठ, सिव्हिल लाईन, जोडभावी पेठ आदी भागातील ६ मिळकतदारांकडे एकूण असलेल्या सात लाख २६ हजार ९३१ रुपये थकबाकीपैकी आज सहा लाख २२ हजार ९३७ रुपये कर वसूल करण्यात आला आहे. दिवसभरात एकूण एक कोटी २८ लाख ४६ हजार ३८ रुपये कर वसुली केली आहे, अशी माहिती मालमत्ता कर विभाग प्रमुख युवराज गाडेकर यांनी दिली.

उद्योजकांची वीज व पाण्याची अडचण दूर करू : आ. राऊत

सुराज्य/बार्शी

महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाने गाताचीवाडी ता. बार्शी येथे औदयोगिक क्षेत्रासाठी संपादित केलेल्या ५४.२४ हेक्टर जागेत उदयोजकांना उदयोग सुरू करण्यासाठी वीज व पाण्याची असलेली अडचण दूर करण्याच्या अनुषंगाने आमदार राजेंद्र राऊत यांनी एमआयडीसीच्या तसेच राज्य विदयुत मंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेवून तसेच प्रत्यक्ष स्थळपाहणी करून दोन्ही समस्या सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

यावेळी आ. राऊत म्हणाले, बार्शीतील एमआयडीसीच्या क्षेत्रात पाणी व वीज याबाबत असलेली अडचण दूर करण्यासाठी उदयोगमंत्री उदय सामंत यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसीचे प्रमुख अधिकारी यांची बैठक झाली. यात त्यांनी मुख्य अभियंता आदींना प्रत्यक्ष जागेवर जावून स्थळपाहणी करून त्याठिकाणच्या अडीअडचणी सोडवाव्यात अशा सूचना दिल्या होत्या. बार्शी औद्योगिक क्षेत्रात उदयोग सुरू करण्यासाठी

पाणी व वीज अशा दोन प्रमुख अडचणी आहेत. विजेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी एमआयडीसीतील एमएसईबी सबस्टेशनसाठी राखीव असलेला सुमारे दोन एकर भूखंड एमएसईबीला त्यांनी केलेल्या मागणीनुसार दिला जाईल. या जागेत ५ एमव्ही चे दोन ट्रान्सफॉर्मर बसविले जातील, असे आ. राऊत यांनी सांगितले. यावेळी नितीन वानखेडे, अधिक्षक अभियंता राजेंद्र गावडे, सुधाकर गांधिले, सांगली सोलापूरच्या प्रादेशिक अधिकारी वसुंधरा जाधव, सोलापूरचे क्षेत्र व्यवस्थापक गणपत कोळेकर, अशोक मगर, पठाण तसेच तसेच तहसीलदार सुनिल शेरखाने, नायब तहसीलदार संजीवन मुंडे, सुरेश कुन्हाडे, नगरपालिकेचे मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण आदी अधिकारी उपस्थित होते.

उद्योग उभारणीसाठी पुढे यावे

उद्योजकांना जागेची उपलब्धता असून येत्या चार महिन्यात वीज व पाण्याची अडचण दूर केली जाईल. त्यामुळे बार्शीतील एमआयडीसी उदयोग उभारणीसाठी उदयोजकांनी पुढे यावे. त्यांना सर्वप्रकारचे सहकार्य केले जाईल अशी ग्वाही आ. राजेंद्र राऊत यांनी यावेळी दिली.

बीआयटी जवळील टाकीतून पाणी देणार

आ. राऊत म्हणाले, पाण्याची उपलब्धता करून देण्यासाठी बीआयटी जवळील पाण्याच्या टाकीतून एमआयडीसीला पाणी दिले जाईल. यामुळे शहराच्या पाणीपुरवठयावर कोणताही परिणाम होणार नाही. सोलापूर येथील एमआयडीसीला ९ रूपये दराने पाण्याचा पुरवठा होत आहे असे एमआयडीसीचे मुख्य अभियंता यांनी सांगितले आहे. त्याप्रमाणे ते तसा अर्ज नगरपालिकेला देतील. त्यानंतर पालिका बोर्ड मिटींग मध्ये ठराव करून तसा ठराव एमआयडीसीला देतील असे आ. राऊत यांनी यावेळी सांगितले.

व्यापाऱ्याला धमकी देत पैसे पळवले

सोलापूर : व्यापाऱ्याला जीवे ठार मारण्याची धमकी देत त्याच्या पॅन्टच्या खिशातून दोन हजार रुपये जबरदस्तीने काढून येतल्याप्रकरणी दोघांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत विकास मारुती धनगर (-वय-२७, रा.लातूर) यांनी फिर्याद दिली आहे. विकास हे केसांची खरेदी विक्री करण्याचा व्यावसाय करतात. ते शिवाजी महाराज चौकातील एका लॉज मध्ये राहत होते. मंगळवारी दोन तरूणांनी त्यांच्यांच्याकडील पैसे पाहिले.त्यानंतर विकास हे आपल्या लॉजकडे जात असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांना लॉजच्या खाली ओढत आणत पाच हजार रुपये दे, अशी मागणी करत पैसे नाही दिला तर जीवे ठार मारून टाकतो अशी धमकी दिली. त्यांच्या पॅन्टच्या खिशातील दोन हजार रुपये काढून येतले. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

रामनवमीनिमित्त वळसंग पोलिसांचा रूट मार्च

सुराज्य/अक्कलकोट

वळसंग पोलीस ठाण्याच्या वतीने कुंभारी व विडी घरकुल मध्ये रूट मार्च करून सण उत्सवामध्ये गोंधळ घालण्याच्या विचार करणाऱ्याला चांगलीच समज दिली आहे. सर्वसामान्य माणसांच्या जीवनात अशांतता निर्माण करणाऱ्यांसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत असा संदेश देण्यासाठीच हा रूट मार्च काढण्यात आला असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले यांनी दिला आहे.

देशभर गुरुवारी रोजी रामनवमी सण साजरा होत आहे. असंख्य रामभक्त आपापल्या परीने या उत्सवात सहभागी होतात. कुंभारी व विडी घरकुल परिसरात राम नवमी संदर्भाने मिरवणूक निघते याच दृष्टिकोनातून अशांतता निर्माण करणाऱ्यांना समज द्यावे म्हणूनच वळसंग पोलिसांकडून रूट मार्च चे आयोजन केल्याची माहिती सपोनीअनिल सनगल्ले यांनी दिली आहे.

सामाजिक ऐक्य राखसाठी कटीबद्ध

पोलीस प्रशासनाची नेहमी भूमिका सामान्य जनतेच्या सुरक्षितता, सामाजिक ऐक्य राखण्यासाठी कटिबद्ध असते .यासाठी वळसंग पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून सर्व धर्मीयांचे सण, महापुरुषांच्या जयंती इतर सामाजिक कार्यक्रमासाठी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी जनतेचे सहकार्य घेऊनच कार्य करतो.

- अनिल सनगल्ले, सपोनी वळसंग

जिल्ह्यात टेक्सटाईल पार्क मंजूर करावे; खा.महास्वामींचे मोदींना निवेदन

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला गतिमान करण्यासाठी सर्वप्रथम लोकसभेत केलेल्या मागणीसह सोलापूर मध्ये टेक्सटाइल पार्क त्वरित मंजूर करावे या विषयासाठी खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांची भेट घेत मागण्यांचे निवेदन दिले. खा. डॉ.जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांनी मंगळवारी संसदीय अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या सत्राच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत त्यांचा सन्मान केला.

याप्रसंगी सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याबाबत विविध विषयांवर चर्चा केली.

यावर पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. सोलापूर येथे टेक्सटाईल पार्क मंजूर होण्यासाठी पाठपुरावा केला होता. सोलापूर मँचेस्टर सिटी म्हणून प्रसिध्द आहे. सोलापूरचे गतवैभव पुन्हा मिळण्यासाठी सोलापूरच्या वस्त्रोद्योगास सक्षम करणे आवश्यक आहे. पी.एम. टेक्सटाइल पार्क योजना सोलापुरातील वरदायिनी ठरणार आहे. त्यामुळे सोलापूरला टेक्सटाइल पार्क मंजूर करण्याबाबत पुन्हा एकदा पंतप्रधानांकडे विनंती केली. केंद्र सरकारने सोलापूर जिल्हा हा तीर्थक्षेत्र जिल्हा घोषित करून तीर्थक्षेत्र व पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा निर्माण करण्याची मागणी केली. या घोषणेमुळे सोलापूर जिल्ह्याचा विकास अधिक गतिमान होणार असल्याची माहिती दिली आहे.

श्री श्री सत्यात्मतीर्थ यांचे आज सोलापुरात आगमन

सोलापूर : श्रीमद् उत्तराधीमठाचे मठाधीपती श्री श्री १००८ श्री सत्यात्मतीर्थ स्वामी यांचे गुरूवार दि.३० मार्च रोजी सोलापुरात आगमन होणार आहे. दुपारी चार वाजता विजयपूर रस्त्यावरील पाटील नगर येथील मठात दर्शन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी फलमंत्राक्षताचा लाभही भक्तांना होणार आहे. तरी सोलापूरच्या साधकांनी उपस्थित रहावे,असे आवाहन श्रीविश्व मध्व महापरिषदेचे सोलापूर शाखेचे बी.जी. कुलकर्णी व पं.श्री.विद्यानिधी आचार्य यांनी केले आहे. सत्यात्मतीर्थ हे होस्पेटहून सोलापूरला येतील.पाटील नगर येथे मठाचे बांधकाम सुरू आहे.त्याची पहाणी ते करतील.

भक्तांना मुद्रा व दर्शन देवून मुक्कामासाठी ते पंढरपूरला जातील.शुक्रवार दि.३१ मार्च रोजी पंढरपूरच्या उत्तराधी मठात स्वामींच्या उपस्थितीत धार्मिक कार्यक्रम होणार आहेत, अशी माहिती कुलकर्णी यांनी दिली.

दैनिक सुराज्यच्या पाठबळातून बाल साहित्याची निर्मिती

प्रभाते मनी पुस्तकाचे आज भंडारकवठ्यात प्रकाशन

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील साधना कुटी सत्संग मंडळाचे संस्थापक तथा जीवन विकास प्रशालेचे कलाशिक्षक विजय बिज्जरगी यांनी लिहिलेल्या प्रभाते मनी या बालसाहित्य पुस्तकाचा प्रकाशन समारंभ गुरूवार दि ३० मार्च रोजी सायंकाळी ५-०० वाजता साधना कुटी येथे श्रीराम नवमीच्या शुभमुर्हूर्तावर होणार आहे. त्यांनी लिहिलेल्या 'प्रभाते मनी'ची मालिका दैनिक सुराज्यने चालवली होती. त्याला सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. सुराज्यच्या पाठबळातून सोलापूरच्या साहित्य विश्वात एका नव्या बालसाहित्याची भर पडत असल्याने सारस्वतांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

श्री समर्थ रामदास स्वामी लिखित दासबोध ग्रंथातील उत्तम लक्षण समासावरील निरूपणावर आधारित बिज्जरगी यांनी विशेष करून विद्यार्थ्यांसाठी प्रबोधन केले आहे. आजच्या विद्यार्थ्यांवर संस्कार झाले पाहिजे, अशी अपेक्षा समाजाकडून व्यक्त होते

आहे. त्याचा विचार या पुस्तकात मांडला गेला आहे. दैनिक सुराज्यने प्रभाते मनी हे सदर चालवले होते. सुमारे तीन वर्षे ही मालिका चालली. सुराज्यने प्रेरणा दिली म्हणून त्यांनी हे सर्व भाग पुस्तक रूपातून वाचकांसमोर आणले आहे. सोलापुरातील दंडवते महाराज मठाचे संचालक गुरू भक्ती परायण गोविंदराज दंडवते यांच्या हस्ते तर ज्येष्ठ लेखिका सौ.स्नेहा शिनखेडे व जुळे सोलापूर साहित्य परिषदेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ होणार आहे. तरी भंडारकवठे पंचक्रोशीतील साधकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन पुरूषोत्तम कुलकर्णी व बिज्जरगी यांनी केले आहे.

दै.सुराज्यचे पाठबळ...

प्रभाते मनी हे साहित्य वाचकांपुढे येण्यासाठी दैनिक सुराज्यने मला मोठे पाठबळ दिले आहे. माझे विचार मी कागदावर उतरवले होते. त्याला प्रसिद्धी मिळावी म्हणून मी सुराज्यचे संपादक राकेश टोळ्ये यांच्याकडे विंनती केली.त्यांनी लागलीच ती मान्य केली आणि मालिकाही सुरू केली. सुराज्यच्या या पाठबळामुळे माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या हातून हे साहित्य पुस्तक रूपातून निर्माण झाले. याचा मनस्वी आनंद आहे. त्याबद्दल सुराज्य परिवाराचा मी ऋणी आहे.

- विजय बिज्जरगी